रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक १२५ | पृष्ठे १२ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in



आजचा रंग
पिवळा

# कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. ३ ऑक्टोबर २०२४

किंमत ४ ₹



नवरात्रोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा

आजचा अग्रलेख
युद्ध थांबत नाही, पापा

# वीज पडतेय, डोक्यात प्रकाश पडणार का ?

आविष्कार देसाई
| रायगड |

पावसाळ्यामध्ये वीज अंगावर पडून मृत्यू होण्याचे प्रकार सरार्स घडतात. जीवितहानीबरोबरच वित्तहानीदेखील होते. विशेषतः समुद्रकिनारी असणाऱ्या ठिकाणी हा धोका अधिक असतो. यावर उपाययोजना म्हणून जिल्ह्यातील ९८० ठिकाणी वीज प्रतिरोधक यंत्रणा बसवण्यात येणार होती. राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्पांतर्गत तब्बल आठ कोटी ३० लाख रुपये खर्चाची ही योजना होती. जिल्हा प्रशासनाने याबाबतचा प्रस्ताव सुमारे चार वर्षांपूर्वी राज्य सरकारकडे पाठवला होता. जिल्ह्यात वीज कडाडून ती पडतदेखील आहे. परंतु, प्रस्ताव मंजूर करायला राज्य सरकारच्या डोक्यात लख्ख प्रकाश अद्याप पडलेला नाही.

- **आठ कोटींची वीज प्रतिरोधक यंत्रणा वाऱ्यावर**
- **प्रस्ताव राज्य, केंद्र सरकारकडे धूळखात**

> वीज प्रतिरोधक यंत्रणा बसवण्यासाठी जिल्ह्यातील ९८० ठिकाण निश्चित करण्यात आली होती. राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्पांतर्गत तब्बल आठ कोटी ३० लाख रुपये खर्चाची ही योजना आहे. राज्य सरकारकडे प्रस्ताव पाठवला आहे. अद्याप त्यावर कार्यवाही झालेली नाही.
>
> – सागर पाठक, जिल्हा आपत्ती व्यवस्थाप अधिकारी



## रेवस, मांडव्याचे दीपस्तंभ दिशादर्शक

ब्रिटिशांच्या कालावधीत अलिबाग तालुक्यातील रेवस आणि मांडवा या ठिकाणी सुमारे १०० फूट उंचीचे दीपस्तंभ उभारण्यात आले होते. पूर्वी समुद्रमार्गे धरमतरची खाडी ते अगदी श्रीवर्धन ते गोवा, कर्नाटकपर्यंत व्यापार चालायचा. त्यांना हे दीपस्तंश दिशादर्शक ठरायचे. त्याचप्रमाणे मुघल कालखंडात रात्रीच्या वेळी भर समुद्रातून एखादे जहाज कोकण प्रांतात येत असेल, तर टेहळणी बुरूज म्हणूनदेखील या दीपस्तंभाचा उपयोग केला जात होता. या दोन्ही दीपस्तंभांवर वीजरोधक प्रणाली बसवण्यात आली होती. त्यामुळे अलिबाग तालुक्यामध्ये वीज पडत नव्हती. सध्या तांब्याच्या साहित्याची सुमारे ५० वर्षांपूर्वी चोरी झाली आहे. सरकारने या दीपस्तंभाची डागडुजी करुन वीज प्रतिरोधक यंत्रणा नव्याने कार्यान्वित करण्याच्या मागणीच्या पुनरुच्चार करण्यात येत आहे.

## जिल्ह्यातील वीज प्रतिरोधक यंत्रणा

जिल्हाधिकारी कार्यालय–१, जिल्हा परिषद मुख्यालय– १, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय –१, जिल्हा सामान्य रुग्णालय–१, उपविभागीय अधिकारी कार्यालय (सर्व)–८, तहसीलदार कार्यालय (सर्व)–१५, गटविकास अधिकारी कार्यालये (सर्व)–१५, नगरपालिका/नगरपंचायत कार्यालये (सर्व)–१५, उपजिल्हा रुग्णालये/ग्रामीण रुग्णालये (सर्व)–१६, प्राथमिक आरोग्य केंद्र (सर्व)–५२, पोलीस ठाणे (सर्व)–३६, बसस्थानके–१५, ग्रामपंचायत कार्यालये (सर्व)–८०४ अशी एकूण ९८० वीज प्रतिरोधकांची संख्या आहे.

जिल्ह्यात सरासरी साडेतीन हजार मिमी पावसाची नोंद होते. मान्सूनपूर्व पडणाऱ्या पावसाच्या वेळी जिल्ह्यातील विविध भागांमध्ये वीज पडण्याच्या घटना सातत्याने घडताना दिसून येतात. त्यामध्ये दरवर्षी सरासरी दोन नागरिकांचा बळी जात आहे, तर गुरे-ढोरे मृत होण्याचे प्रमाणही लक्ष वेधणारे असेच आहे. वीज पडून होणाऱ्या आपत्तीमध्ये सार्वजनिक तसेच खासगी मालमत्तेचेही लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान होत आहे. जिल्ह्याची लोकसंख्या सुमारे २६ लाखांच्या आसपास आहे. •› पान २ वर

सर्वसाधारणपणे उंच इमारती, मोबाईल टॉवर, कंपन्यांच्या चिमण्या, वेधशाळा, उच्च दाबाच्या वीज वाहिनी टॉवर या ठिकाणी वीज प्रतिरोधक यंत्रणा बसवण्यात आलेली आहे. या ठिकाणच्या परिसरामध्ये वीज कोसळली तर वीज प्रतिरोधक यंत्रणा आपल्याकडे वीज खेचून घेते. त्यानंतर सक्षम प्रणालीच्या माध्यमातून ती जमिनीखाली वळवली जाते. त्यामुळे वीज पडण्याच्या घटना कमी होऊन मनुष्य आणि वित्तहानी टाळता येते. याच कारणासाठी जिल्ह्यात वीज प्रतिरोधक यंत्रणा बसवण्यात येणार होती.

## वेध|क

### पर्यटक महिलेची आत्महत्या

**अलिबाग :** मुंबईतील एका ३४ वर्षीय नेहा पोतदार या महिला पर्यटकाने विषारी औषध घेऊन आत्महत्या केल्याची घटना कुरुळ येथील एका हॉटेलमध्ये घडली. मृत्यूस कोणीही जबाबदार नसल्याची चिठ्ठी तिने लिहून ठेवल्याची माहिती पोलिसांनी दिली. ही महिला मंगळवारी अलिबागमध्ये फिरण्यास आली होती. दरम्यान, तिची मानसिक स्थिती व्यवस्थित नसल्याची माहिती तिच्या नातेवाईकांच्या लक्षात आल्यावर त्यांनी हॉटेलमधील व्यवस्थापनाशी संपर्क साधून खोलीचा दरवाजा उघडण्यास सांगितले. त्यांनी दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला. परंतु, तो उघडला नाही. ही बाब अलिबाग पोलिसांना समजताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली.

### हेलिकॉप्टर कोसळून तीन ठार

**पुणे :** बावधन येथे हेलिकॉप्टर कोसळून तीन जणांचा मृत्यू झाल्याची घटना बुधवारी (दि. २) सकाळी साडेसातच्या सुमारास घडली. दरम्यान, हा अपघात का व कसा झाला, यासंदर्भात नागरी हवाई वाहतूक महासंचालनालय आपला अहवाल सादर करणार आहे. हा अहवाल प्राप्त झाल्यानंतर हिंजवडी पोलीस पुढील कारवाई करणार आहेत. या अपघातात दोन पायलट आणि एका विमान देखभाल अभियंत्याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. पहाटेच्या सुमारास धुके जास्त असल्याने डोंगराळ भागात हेलिकॉप्टर भरकटले आणि कोसळले. हेलिपॅडपासून दीड किलोमीटर अंतरावरच हा अपघात झाला. दरम्यान, हेलिकॉप्टर कोसळण्याची महिन्याभरातील ही दुसरा घटना आहे.

### आ. भुयारांकडून महिलांचा अवमान

**पुणे :** अमरावतीच्या मोर्शीचे अजित पवारांचे समर्थक आमदार देवेंद्र भुयार यांनी महिलांबाबत वादग्रस्त विधान करुन त्यांचा अवमान केला आहे. एका जाहीर कार्यक्रमात त्यांनी पोरगी जर स्मार्ट हवी असेल तर ती तुमच्या, माझ्यासारख्या पोरांना मिळत नाही. नोकरीवाल्याला भेटते. दोन नंबरची पोरगी ज्यांचा पानाचा ठेला, धंदा, किराणा दुकान आहे, अशा मुलांना भेटते आणि तीन नंबरचा गाळ, राहिलेली पोरगी शेतकऱ्यांच्या पोरांना भेटते, शेतकऱ्यांच्या पोरांचं काही खरं राहिलं नाही, असे महिलांविषयी बेताल वक्तव्य केले आहे. दरम्यान, महिलांविरोधातील या वादग्रस्त वक्तव्यानंतर संताप व्यक्त केला जात आहे.

# भूमीगत विद्युत वाहिन्यांचे काम निकृष्ट

- **प्रसारमाध्यमांकडून कामाची पोलखोल**
- **चौकशीअंती काम इस्टिमेंटप्रमाणे न झाल्याचे सिद्ध**

| पेण | प्रतिनिधी |

पेण शहरात साधारणतः १५ वर्षांपूर्वी भूमीगत विजेच्या तारा फिरवण्यात आल्या होत्या. लाखो रुपये खर्च करुन झालेले काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून, संबंधित विभागाचे नियम धाब्यावर बसवणारे आहे. या कामामुळे उच्च दाबाच्या विद्युत वाहिन्यांमध्ये तांत्रिक अडचणी निर्माण होऊन शहरवासियांचा जीव धोक्यात येण्याची शक्यता आहे. प्रसारमाध्यमांनी या कामाची पोलखोल केल्यावर •› पान २ वर



## ठेकेदाराचे मनमानी काम

याबाबत महावितरण कंपनीचे पेणचे उपअभियंता खोबरागडे यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी सांगितले की, या कामाशी आमचा संबंध नाही. तरीही मी माझ्या कनिष्ठ अधिकाऱ्यांकडून माहिती घेऊन आपल्याशी बोलतो. तर, नगरपालिकेचे बांधकाम अभियंता सुहास कांबळे यांनी सांगितले की, सामाजिक न्याय विभागाने नगरपालिकेला कळविले आहे; परंतु रितसर कोणतीही एनओसी घेतली नाही. एकंदरीत, ठेकेदाराला जसं वाटतं, तसं तो काम करतोय. मात्र, भविष्याचा विचार करता हे काम सदोष झाले नाही तर भविष्यात पेणकरांना अनेक बाबींना सामोरे जावे लागेल.

# सायकलच्या चाकातून शिक्षणाला गती

**चित्रलेखा पाटील यांचे प्रतिपादन | खानाव, बामणगाव, सत्यवाडीमधील १५७ मुलींना मोफत सायकल**

| अलिबाग | प्रतिनिधी |

स्व. नारायण नागू पाटील, स्व. प्रभाकर पाटील, स्व. दत्ता पाटील या नेत्यांनी ग्रामीण भागातील शिक्षणाची दारे खुली केली. त्यांचा हा वारसा जपण्याचा प्रयत्न माजी आ. जयंत पाटील यांच्या मार्गदर्शनातून केला जात आहे. मुलींच्या शिक्षणाचा मार्ग मोकळा झाला पाहिजे यासाठी गावे, वाड्यांमधील शाळकरी मुलींसाठी सायकली देण्याचा उपक्रम हाती घेतला. या उपक्रमातून मुलींच्या चेहऱ्यावर हसू आणण्याचे काम केले आहे. सायकलीतून मुलींच्या शिक्षणाला गती देण्याचा प्रयत्न केला असल्याचे प्रतिपादन शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी केले. •› पान २ वर



● (छायाचित्र : समीर मालोदे)

> या भागात गेल कंपनीमार्फत प्रकल्प उभा राहात आहे. या प्रकल्पातून स्थानिकांना चांगला पगार मिळावा, महिलांना रोजगारनिर्मिती व्हावी, ही शेकापची भूमिका आहे. त्याचा फायदा खानाव, उसरसह परिसरातील अनेक गावांना झाला पाहिजे. त्यासाठी सर्वांनी सोबत एकत्र येऊन काम करण्याची गरज आहे. खानावमध्ये एक वेगळी क्रांती घडविली.त्या क्रांतीला सलाम आहे.
>
> – चित्रलेखा पाटील

# लाचखोर तलाठी एसीबीच्या जाळ्यात



| सुधागड-पाली | वार्ताहर |

सुधागड तालुक्यातील एका तलाठ्याने उत्खननाची दिलेली नोटीस रद्द करून कारवाई न करण्याकरिता धोंडसे येथील व्यक्तीकडून तीन लाख रुपयांची मागणी केली होती. त्या अनुषंगाने तलाठ्यावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सोमवारी (दि. ३०) रात्री १० वाजताच्या सुमारास पाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, सुधागड तालुक्यातील धोंडसे येथील तक्रारदार यांनी आपल्या जमिनीमध्ये घर बांधायचे असल्यामुळे व झाडे लावायची असल्यामुळे रस्ता बनवला होता. हा रस्ता बनवताना जमिनीतील माती बाजूला केली असल्याने सदर जागेत मातीचे बेकायदेशीर उत्खनन केले असल्याचे उद्धव गुंजाळ (५०) तत्कालीन तलाठी सजा नाडसूर सध्या नेमणूक तलाठी सजा वाघोशी तालुका सुधागड यांनी तक्रारदारांना सांगून रुपये दहा लाख दंड भरावा लागेल असे सांगितले. आणि तीन लाख रुपये लाचेची मागणी केली होती. तक्रारदार याने केलेल्या तक्रारीच्या •› पान २ वर

# तोतया इन्कमटॅक्स अधिकाऱ्यांना अटक

**नागरिकांच्या सतर्कतेमुळे प्रयत्न फसला**

| रायगड | खास प्रतिनिधी |

इन्कम टॅक्स अधिकारी असल्याची बतावणी करुन रोहा शहरातील एका व्यावसायिकाला लुटण्याचा प्रयत्न नागरिक आणि पोलिसांच्या सतर्कतेमुळे फसला. पोलिसांनी याप्रकरणी चार जणांना अटक केली असून, गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एक आरोपी पोलिसांच्या हातावर तुरी देण्यात यशस्वी ठरला. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

पोलिसांनी अटक केलेल्यामध्ये फैयाज कादिर काझी (५२) रा. सोमठणे-पुणे, मोहम्मद गौस उमर शेख राहणार सिद्धिविनायक बिल्डिंग अंबरनाथ-ठाणे, कुदबुद्दीन दाऊद सय्यद (३९) रा. अंबरनाथ-ठाणे यांचा समावेश आहे. तसेच आयाज शेख असे पळून गेलेल्या व्यक्तीचे नाव आहे.

**रोहा शहरातील खालचा मोहल्ला येथे मोहम्मद आसिफ शौकत अन्सारी (३८) राहतात. ते व्यवसायाने दुकानदार आहेत. त्यांच्या राहत्या घरात चार व्यक्ती इन्कम टॅक्स अधिकारी असल्याचे सांगून आले. त्यांनी त्यांच्याकडील ओळखपत्र दाखवले. त्यानंतर त्यांनी मोहम्मद अन्सारी यांचे वडील शौकत अन्सारी यांच्या नावाचे सर्च वॉरंट दाखवले आणि घराची झडती घेण्यास सुरुवात केली.**

घरामध्ये आलेल्या व्यक्तींचा मोहम्मद यांना संशय आला. त्यांनी तातडीने सदरची बाब पोलिसांना सांगितली. पोलिसांना कळविले म्हणून त्यांनी अन्सारी कुटुंबाला शिव्या दिल्या, तसेच दमदाटी केली. त्यावेळी मोहम्मद यांची वहिनी तेथे आली असता त्यातील आरोपी हरमीद सुमिद सिंग या इसमाने वहिनीच्या गळ्यातील चेन जबरदस्तीने हिसकावण्याचा प्रयत्न केला. त्याला अटकाव करत असतानाच तेथे पोलीस आणि आजूबाजूचे लोक तेथे आल्याने त्यातील एक इसम पळून गेला. या घटनेची फिर्यादी मोहम्मद आसिफ शौकत अन्सारी यांनी दिली.

# आजपासून नवरात्रौत्सवाची धूम



| अलिबाग | प्रतिनिधी |

गणेशोत्सवानंतर रायगड जिल्ह्यामध्ये आता नवरात्रौत्सवाची धूम सुरु होणार आहे. नऊ दिवस वेगवेगळे धार्मिक, सांस्कृतिक, गरबा, सामाजिक उपक्रमांसह समाजप्रबोधनाचे कार्यक्रम मंडळामार्फत घेतले जाणार आहे. जिल्ह्यामध्ये गुरुवारी (दि. २) घटस्थापनेनंतर चार हजार ४९६ ठिकाणी घरोघरी घटस्थापना होणार आहे. त्यामध्ये एक हजार ३३६ ठिकाणी दुर्गामातेच्या मूर्तीची प्रतिष्ठापना, तर तीन हजार १६० ठिकाणी प्रतिमा पूजनदेखील होणार आहे.

गणरायाची दीड, पाच, सात व दहा दिवस सेवा केल्यानंतर आता वेध नवरात्रौत्सवाचे लागले आहेत. गुरुवारी जिल्ह्यात मूर्तीसह प्रतिमा, घटांची प्रतिष्ठापना होणार आहे. त्यानिमित्ताने देवीच्या स्वागतासह सजावटीसाठी लागणारे पूजेचे व सजावटीचे साहित्य खरेदीसाठी महिलांनी बुधवारी सायंकाळी जिल्ह्यातील बाजारपेठांमध्ये प्रचंड गर्दी केली होती. झेंडूच्या फुलांसह सजावटीच्या साहित्यांनी जिल्ह्यातील बाजारपेठा फुलून गेल्या होत्या. वेगवेगळ्या मंडळामार्फत वेगवेगळे कार्यक्रमदेखील घेतले जाणार आहेत. त्याची तयारी अंतिम टप्प्यात असून, नऊ दिवस क्रीडा, •› पान २ वर

**जागतिक रेबीज दिनानिमित्त विशेष मोहीम**

# हजारो प्राण्यांचे लसीकरण

**पशुसंवर्धन विभागामार्फत जनजागृती**

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

जागतिक रेबीज दिनानिमित्त पशुसंवर्धन विभागामार्फत रायगड जिल्ह्यामध्ये विशेष कार्य मोहीम राबविण्यात आली. यावेळी जिल्ह्यातील पाळीव कुत्रे, मांजरी व घोडे आदी मिळून तब्बल १३४३ प्राण्यांना रेबीज रोग प्रतिबंधात्मक लसीकरण करण्यात आले. तसेच तज्ज्ञांनी रेबीजबद्दल शास्त्रशुद्ध माहिती देऊन जनजागृती केली.

जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, रायगड डॉ. सचिन देशपांडे यांनी सांगितले की, रेबीजबद्दल लोकांना जागरूक करण्यासाठी आणि प्राण्यांना व मानवाला या प्राणघातक आजारापासून वाचवण्यासाठी दरवर्षी २८ सप्टेंबर रोजी जगभरात जागतिक रेबीज दिन साजरा केला जातो. जागतिक रेबीज दिनाच्या निमित्ताने पशुसंवर्धन विभागामार्फत रायगड जिल्ह्यातील पाळीव कुत्रे, मांजरी आणि घोडे यांना रेबीज रोग प्रतिबंधात्मक लसीकरण करण्यात आले असून, जिल्ह्यातील शाळांमध्ये रेबीज रोग जनजागृती केली आहे, अशी माहिती डॉ. सचिन देशपांडे यांनी दिली आहे.

जिल्हा पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय, रायगडचे सहाय्यक आयुक्त डॉ. अजय •› पान २ वर



(छायाचित्र : धम्मशील सावंत)



### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

३ ऑक्टोबर

१) श्रीम. क्षमा दत्तात्रेय जोशी
चेंढरे, अलिबाग, ३-१०-१९५४

२) श्री. हरिश्चंद्र मोरू पाटील
खंडाळा, अलिबाग, ३-१०-१९५३

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

### आजचे अन्नदाते



**श्री. संजय लक्ष्मण रावले, वाढदिवस अलिबाग**



**अनुराग चंद्रशेखर पाटील, वाढदिवस अलिबाग**

# बोगस मतदारांविरोधात न्यायालयात धाव

## माजी आमदार बाळाराम पाटील यांची माहिती

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

**१८८ पनवेल विधानसभा मतदारसंघात ६ लाख ४२ हजार ५७ मतदार येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत मतदान करणार आहेत. प्रसिद्ध यादीतील ८५ हजारांहून अधिक नावे दुबार आणि बोगस असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. शेकापचे माजी आमदार बाळाराम पाटील यांनी महाविकास आघाडीच्यावतीने उच्च न्यायालयात या दुबार आणि बोगस नोंदणीविरोधात धाव घेतली आहे. पनवेलच्या शेतकरी कामगार पक्ष कार्यालयामध्ये बुधवारी (दि. १) पत्रकार परिषद घेऊन त्यांनी माध्यमांना याबाबत अवगत केले.**




यावेळी पनवेल-उरण महाविकास आघाडीचे अध्यक्ष तथा शिवसेना सल्लागार बबन पाटील, शेकाप नेते तथा उद्योजक जे.एम. म्हात्रे, पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायण घरत, पनवेल विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष काशिनाथ पाटील, पनवेल शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष सुदाम पाटील, शेकापचे पनवेल जिल्हा चिटणीस गणेश कडू आदी मान्यवर उपस्थित होते.

बाळाराम पाटील यांनी निवडणूक आयोगाच्या विभागीय अधिकाऱ्यांच्याकडे अर्ज करून दुबार आणि बोगस नोंदणीविरोधात प्रशासनाचे लक्ष वेधले होते. परंतु, अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष होण्याची शक्यता असल्याने त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. निवडणूक आयोगाकडे अद्ययावत नोंदणी सॉफ्टवेअर असल्याने त्याचा वापर करून दुबार आणि बोगस नोंदणीविरोधात अभियान चालविण्यात यावे, असे बाळाराम पाटील यांनी याचिकेमध्ये नमूद केले आहे. तूर्तास १८८ पनवेल मतदारसंघात २५,८५५ मतदारांची दुबार नोंदणी झालेली आहे. १५०-ऐरोली मतदारसंघातील १६,०९६ नावे, १९०- उरण मतदारसंघातील २७,२७५ नावे आणि १५१-बेलापूर मतदारसंघातील १५,३९७ नावे पनवेल मतदारसंघात अंतर्भूत झालेली आहेत. याव्यतिरिक्त ५८८ नावांचा कन्नड अथवा अन्य दक्षिण भारतीय भाषांमध्ये पत्ता आहे. परंतु, संपूर्ण नाव नमूद नाही. या सर्व नावांना मतदार यादीतून वगळण्यात यावे, अशी मागणी बाळाराम पाटील यांनी याचिकेद्वारे केली आहे.

### आयोगाने सतर्क राहावे

**कोकण पदवीधर मतदारसंघाच्या वेळेलादेखील महाविकास आघाडीचे उमेदवार रमेश कीर यांच्या मतदानाच्यावेळी सीकेटी हायस्कूल येथे मतदान केंद्र उभारू नये, अशी आम्ही मागणी केली होती. आमची मागणी धुडकावल्यानंतर नेमके याच मतदार केंद्रांमध्ये तीन मतदारांच्या नावाने बोगस मतदान झाल्याचे आम्ही उघड केले होते. राहुल काशिनाथ पाटील, सौरभ संतोष तांबोळी, अर्चना सागर चौधरी या मतदारांच्या नावावर अगोदरच मतदान झाल्याचे निष्पन्न झाले होते. अत्यंत गंभीर गुन्हा असूनदेखील निवडणूक आयोगाने याची फारशी दाखल घेतली नाही. आम्ही हा विषय रेटून धरल्यानंतर त्यांना टेंडर वोट करण्याची अनुमती देण्यात आली.**

याव्यतिरिक्त शेकाप कार्यकर्त्यांनी अध्ययन करून दोन हजार एकशे साठ बोगस नावे शोधलेली असून, तीदेखील वगळण्यात यावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. यासोबत २२०० मतदार स्थलांतरित झाल्याचे सकृत दर्शनी आढळून आले आहे. ही सर्व नावेदेखील मतदार यादीतून वगळण्यात यावीत, अशी बाळाराम पाटील यांनी मागणी केली आहे.

यावेळी बाळाराम पाटील म्हणाले की, लोकशाहीच्या चार स्तंभांपैकी न्यायपालिका आणि माध्यमे अशा दोन भक्कम स्तंभांकडे आम्ही आमची कैफियत मांडली आहे. अधिकारी वर्ग विद्यमान आमदार आणि त्यांच्या शीर्ष नेतृत्वाच्या दबावाखाली काम करत असल्याची आमची भावना आहे. म्हणूनच सेन्सिटिव्ह पोलिंग बूथवरती सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची मागणी आम्ही केली आहे.

उपरोक्त मतांव्यतिरिक्त जवळपास ११ हजार मते आमच्या कार्यकर्त्यांनी दुबार व बोगस असल्याचे शोधून काढले आहे. सकृत दर्शनी एक लाख मते नियमबाह्य पद्धतीनं मतदार यादीत समाविष्ट आहेत. आज देशाचे गृहमंत्री येऊन साम, दाम, दंड, भेद, नीती वापरा अशी भाषा करत असतील, तर सुदृढ लोकशाहीच्या दृष्टीने ते अत्यंत चुकीचे ठरेल. परंतु, यावेळेस आम्हीदेखील अद्ययावत प्रणालीसह तयार राहणार आहोत.



# जिल्हाभर स्वच्छता अभियान

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

जिल्हा परिषदेच्या माध्यमातून १ व २ ऑक्टोबर रोजी जिल्ह्यात श्रम दान मोहीम उत्साहात राबविण्यात आली. श्रमदान मोहिमेंतर्गत गावागावात स्वच्छता अभियान हाती घेण्यात आले होते. स्वच्छता अभियानात लोकप्रतिनिधी, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत अधिकारी, कर्मचारी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, नागरिक सहभागी झाले होते.

शासनाने १ व २ ऑक्टोबर रोजी देशभर स्वच्छता ही सेवा अभियान राबविण्याचा निर्णय जाहीर केला होता. त्यानुसार रायगड जिल्ह्यात गावागावात श्रमदान करण्याचे नियोजन करण्यात आले. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून सर्वांनी श्रमदान मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्याचे दृश्य परिणाम पहावयास मिळाले. प्रत्येक गावागावात उत्स्फूर्तपणे स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

> **जिल्ह्यात आज सर्वत्र श्रमदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. श्रमदान ही एक चळवळ म्हणून सर्वांनी कायम ठेवली पाहिजे. सर्वांनी मिळून पृथ्वी, जल, वायू स्वच्छ ठेवण्यासाठी प्रयत्न करावेत. प्रत्येकाने आपला परिसर स्वच्छ ठेवण्यासोबत सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ ठेवण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे.**
> **– डॉ. भरत बास्टेवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद**

स्वच्छता अभियानांतर्गत सार्वजनिक परिसर, शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, प्रार्थनास्थळे, बाजार, बस स्थानक, समुद्रकिनारे, नदी किनारी, तलाव परिसर यासह इतर ठिकाणी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. जमा करण्यात आलेला कचरा ग्रामपंचायतीच्या माध्यमातून डंपिंग ग्राऊंड ठिकाणी नेण्यात

पान १ वरून

## वीज पडतेय, डोक्यात प्रकाश कधी का?

जिल्ह्यात असणाऱ्या विविध प्रकल्पांमुळे नागरीकरणामध्ये झपाट्याने वाढ होताना दिसत आहे. दाटीवाटीच्या शहर-गावांमध्ये वीज पडल्यास मोठ्या प्रमाणात हानी होण्याच्या घटना सातत्याने घडत आहेत. यावर उपाययोजना करण्यासाठी जिल्ह्यातील १३ विभागांतील ९८० ठिकाणी वीज प्रतिरोधक यंत्रणा बसवण्याचे नियोजन केले होते.

याबाबतचा प्रस्ताव राज्य सरकारकडून केंद्र सरकाराल पाठवण्यात आला असल्याचे तत्कालीन संचालक (राज्य आपत्ती व्यवस्थापन विभाग) अभय यावलकर यांनी तेव्हा स्पष्ट केले होते. मात्र, अद्यापही सरकारी पातळीवरुन कोणताच सकारात्मक प्रतिसाद आला नसल्याचे जिल्हा आपत्ती विभागाने स्पष्ट केले.

## सायकलच्या चाकातून शिक्षणाला गती

अलिबाग तालुक्यातील खानाव, बामणगाव ग्रामपंचायतीसह सत्यवाडी येथील गरीब, गरजू १५७ मुलींना मोफत सायकल वाटपाचा कार्यक्रम बुधवारी (दि.२) धसाडे कुणे येथे आयोजित केला होता. यावेळी चित्रलेखा पाटील बोलत होत्या.

यावेळी गजानन पाटील, खानावचे सरपंच अजय नाईक, शेकाप पुरोगामी युवक तालुका अध्यक्ष विक्रांत वार्डे, युक्ता गुजर, निधी पाटील, मनिषा म्हात्रे, विशाखा गायकर, काविरी मानकर, मेघा थळे, दिपा म्हात्रे, जागृती घरत, निकिता राऊत, मनिषा म्हात्रे, प्रणित पाटील, विजय गायकर, योगेश गुजर, जगदीश भगत, सुधाकर ठाकूर, सतीश भगत, अमित देशपांडे, महेंद्र विद्रे, मोहन धुमाळ, उत्तम रसाळ, मधुकर ढेबे, रामचंद्र मांडवकर, बाळाराम म्हात्रे, लक्ष्मण पवार, सेवानिवृत्त शिक्षक रवींद्र धसाडे, शत्रुघ्न ठाकूर, गंगाराम धसाडे, राजेश टोपले, महेश म्हात्रे, महादेव पारधी, सतीश म्हात्रे, दिनेश धसाडे, तुलशीराम धसाडे, राम थळे आदी मान्यवर, खानाव, बामणगाव व सत्यवाडी येथील विद्यार्थिनी, त्यांचे पालक, महिला व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी चित्रलेखा पाटील म्हणाल्या, शिक्षण हाच विकासाचा खरा पाया आहे. मुली शिकल्या पाहिजे, मुलींची शैक्षणिक प्रगती झाली पाहिजे, ही शेतकरी कामगार पक्षाची ठाम भूमिका राहिली आहे. आजही समाजात मुलीला समानता दिली जात नाही. हे चित्र बदलण्यासाठी मुलींच्या शिक्षणावर भर देणे काळाची गरज आहे. मुलींची शैक्षणिक प्रगती झाल्यावर समाजात एक आमूलाग्र बदल होईल, असा विश्वास आहे. मुली वेगवेगळ्या क्षेत्रात आणखी सक्षमपणे उभ्या राहिल्यास एक वेगळी क्रांती निर्माण होईल. सावित्राबाई फुले यांनी अनेक संकटांवर मात करीत मुलींना शिकविण्याचे काम केले. त्यांच्याकडूनच प्रेरणा घेत 'सावित्रीच्या लेकी' या संकल्पनेतून मुलींसाठी सायकली देऊन त्यांची शैक्षणिक प्रगती करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. रायगडसह उस्मानाबाद, धुळे अशा अनेक ठिकाणी हजारो मुलींना सायकली वाटप केल्या आहेत, त्याचा आनंद आहे.

## आजपासून नवरात्रोत्सवाची धूम

शैक्षणिक, सामाजिक कार्यक्रम घेण्यासाठीदेखील अनेक मंडळ सज्ज आहेत. शहरी भागासह ग्रामीण भागातदेखील हा उत्सव जल्लोषात साजरा करता यावा, यासाठी गावे, वाड्यांमधील मंडळाचे पदाधिकारी, सदस्य, ग्रामस्थ कामाला लागले आहेत. शहरी भागातदेखील तरुणाई, ज्येष्ठ मंडळांनी आपापल्या परीने योग्य पद्धतीने तयारी केली आहे. देवीची मूर्ती काहींनी आणून ठेवली, तर काही ठिकाणी मूर्ती गुरुवारी सकाळी आणली जाणार आहे.

रायगड पोलीस दलाच्या हद्दीत चार हजार ४९६ ठिकाणी प्रतिष्ठापना केली जाणार आहे. त्यामध्ये एक हजार ३३६ मूर्तींचा समावेश असून, एक हजार १४३ सार्वजनिक व १९३ खासगी ठिकाणी मूर्ती विराजमान होणार आहे. तसेच जिल्ह्यातील घट व प्रतिमांसह तीन हजार १६० ठिकाणी स्थापना केली जाणार आहे.

## भूमीगत विद्युत वाहिन्यांचे काम निकृष्ट

चौकशी समिती नेमण्यात आली. चौकशीअंती काम इस्टिमेंटप्रमाणे न झाल्याचे आढळून येऊन पूर्ण काम निकृष्ट दर्जाचे आहे हे सिद्ध झाले.

तत्कालीन ठेकेदाराला शासनाने काळ्या यादीत टाकले आणि हजारो रुपये शासनाचे पाण्यात गेले. त्यानंतर पेण शहरात भूमीगत विजेच्या तारांचे काम झाले नाही; परंतु आता सामाजिक न्याय विभागाकडून राखीव वस्तीसाठी भूमीगत विजेच्या तारांचे काम आले असून, हे काम ठेकेदार मनमानेल तसे करीत आहेत. महत्त्वाची बाब म्हणजे, या भूमीगत विजेच्या तारांचे काम करताना स्थानिक प्रशासन म्हणजे नगरपालिकेकडून रितसर परवानगी घेणे गरजेचे होते. मात्र, ती परवानगी घेतलेली नाही. तसेच ठेकेदाराने या भूमीगत विजेच्या तारा टाकण्यासाठी जी खोदाई केली आहे, ती इस्टिमेंटप्रमाणे झालेली नाही. तसेच पेण शहरातील पाण्याची मुख्य पाईपलाईनच्या शेजारून या विजेच्या तारा टाकण्यात आलेल्या आहेत. भविष्यात जर विजेच्या तारांमध्ये काही दोष निर्माण झाल्यास पाईपलाईनवर काम करणाऱ्या नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांचा जीव धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही. तसेच भूमीगत तारा तपासल्याची कोणतीही माहिती ना महावितरण कंपनीकडे, ना नगरपालिकेकडे. महत्त्वाची बाब म्हणजे, भूमीगत तारांचे काम करत असताना या विजेच्या तारा विशिष्टप्रमाणे तपासून त्याचा रिपोर्ट घेऊन नंतरच इस्टिमेंटमध्ये दिलेल्या आराड्यानुसार जमिनीमध्ये टाकायच्या असतात. पाईपलाईन ज्या भागात टाकायची आहे, त्याची खोदाई तीन ते साडेतीन फूट करणे गरजेचे असते, नंतर विजेच्या तारा टाकत असताना खालच्या बाजूने खडी, त्यानंतर अर्धगोळाकार पाईप, रस्ता क्रॉसिंग असेल त्या ठिकाणी सिमेंटच्या फरशा पाईप वरून टाकणे गरजेचे असते. परंतु, अशा प्रकारच्या विजेच्या तारा कोठेही जमिनीत टाकलेल्या दिसत नाहीत. याचाच अर्थ, पेण शहरात ज्या विभागात या विद्युत तारांचे काम सुरू आहे, ते पूर्णतः निकृष्ट दर्जाचे व इस्टिमेंटप्रमाणे सुरू नाही.

## लाचखोर तलाठी एसीबीच्या जाळ्यात

अनुषंगाने पडताळणीच्या वेळी ७ ऑगस्ट २०२४ पाली-सुधागड तहसील कार्यालय येथे तलाठी उद्धव गुंजाळ याने तक्रारदार यांच्याकडे तीन लाख रुपये लाचेची मागणी करून स्वीकारण्याचे मान्य केले. परंतु, तक्रारदार यांच्या हालचालीवर संशय आल्याने लाचेची रक्कम स्वीकारली नाही. त्यामुळे सोमवारी (दि. ३०) तलाठी उद्धव गुंजाळ यांच्याविरोधात पाली पोलीस ठाणे येथे लाच मागणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपअधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रायगड-अलिबाग शशिकांत पाडावे करीत आहेत. पोलीस अधीक्षक लाचलुचत प्रतिबंधक विभाग ठाणे परिक्षेत्र, ठाणे सुनील लोखंडे व अप्पर पोलीस अधीक्षक महेश तरडे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर प्रक्रिया पार पडली. लाचलुचपत प्रतिबंध विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात आले की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे यांच्याशी संपर्क साधावा.

## हजारो प्राण्यांचे लसीकरण

कांबळे यांनी सांगितले की, सर्वात जुन्या विषाणूजन्य रोगांपैकी एक रेबीज हा रोग लसीद्वारे रोखता येतो. हा झुनोटिक रोग मानवामध्ये एखाद्या रेबीज झालेल्या प्राण्याच्या चाव्याद्वारे किंवा ओरखड्यांद्वारे पसरतो आणि मध्यवर्ती मज्जासंस्थेवर परिणाम करतो. क्लिनिकल लक्षणे दिसू लागल्यास रेबीज १०० टक्के प्राणघातक ठरू शकतो. डब्ल्यूएचओने २०३० पर्यंत कुत्रा-मध्यस्थ रेबीजमुळे होणारे मृत्यू संपवण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. रेबीज रोग प्रतिबंधात्मक लस प्राणी आणि मानव यांच्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावत आहे. त्याचा वापर प्राण्यामध्ये आणि मानवांमध्ये रेबीजचा धोका कमी करू शकतो, असे डॉ. अजय कांबळे यांनी सांगितले.

१८ व्या जागतिक रेबीज दिन २०२४ ची थीम, ब्रेकिंग रेबीज बाऊंडरीज ही आहे. ही थीम सरकार, आरोग्य संस्था, पशुवैद्यकीय सेवा आणि समुदायांना एकत्र आणून, क्रॉस-सेक्टरल आणि क्रॉस-बॉर्डर सहयोगाची गरज असल्याचे दर्शविते.

**रेबीजचे दोन प्रकार**

फ्युरियस रेबीज : याला एन्सेफॅलिटिक रेबीजदेखील म्हणतात. हे ८० टक्के मानवी प्रकरणांमध्ये आढळते आणि रुग्णांमध्ये हायड्रोफोबिया (पाण्याची भीती) दिसून येते.

अर्धांगवायूचा रेबीज : याला मुका रेबीजदेखील म्हणतात. ज्यामुळे प्रामुख्याने अर्धांगवायू होतो. वेडसर कुत्रा चावल्यास किंवा रेबीजच्या संभाव्य संपर्कात आल्यास, आपत्कालीन प्रतिसाद म्हणून खालील प्रथमोपचार किंवा पोस्ट-एक्सपोजर प्रोफिलॅक्सिस सुरू केल्या जाऊ शकतात. या पायऱ्या मध्यवर्ती मज्जासंस्थेमध्ये विषाणूचा प्रवेश प्रतिबंधित करतात, त्यामुळे त्याची प्रगती होण्यास विलंब होतो.

**प्रथमोपचाराच्या पायऱ्या**

कमीत कमी १५ मिनिटे साबणाने, पाण्याने जखम मोठ्या प्रमाणात धुवा. रक्तस्त्राव झाल्यास, दबाव लागू करणे आवश्यक आहे. हे रक्त प्रवाह प्रतिबंधित केले पाहिजे. रेबीजच्या संसर्गानंतर शक्य तितक्या लवकर स्थानिक जखमेवर उपचार व लसीकरण करावे. प्राण्याची माहिती मिळायला हवी. पाळीव प्राणी असल्यास लसीकरण इतिहास मिळू शकतो. रुग्णाला तातडीने रुग्णालयात हलवले पाहिजे.

**तालुकानिहाय लसीकरण**

१. खालापूर - १६५, २. पनवेल - ७३
३. अलिबाग - १३३, ४. श्रीवर्धन - २०६,
५. पेण - १५८, ६. कर्जत - ३०७
७. माणगाव - १२१, ८. तळा - ६४
९. महाड - २६ १०. पोलादपूर - ३७
११. उरण - १९, १२. पाली - १३
१४. रोहा - १२, १५. मुरुड - ०९
एकूण - १३४९

# तरुणाई ठरवणार नवा आमदार



**। पनवेल ग्रामीण । वार्ताहर ।**

विधानसभा मतदारसंघात ६ लाख ३४ हजार मतदारांची नोंद झाली आहे. यापैकी सुमारे ६७ टक्के मतदार २० ते ४९ वयोगटातील तरुण मतदार आहेत. यामुळे पनवेलचा भविष्यातील आमदार तरुण मतदार ठरवणार आहेत. पनवेल विधानसभा मतदारसंघात महानगरपालिकेचा समावेश असल्याने पाणीटंचाई, खड्डेमय रस्ते, मालमत्ता कर, मोकळी जागा यासारख्या अनेक न सुटलेल्या समस्यांबद्दल मतदार चिंतेत आहेत. त्यांना आगामी निवडणुकीत नेतृत्व बदलाची अपेक्षा आहे.

सुधारित मतदार आकडेवारीनुसार, पुरुष मतदारांची संख्या ३.३८ लाख, महिलांची संख्या २.९६ लाख आणि ट्रान्सजेंडर-७३ आहे. मतदारांचे आठ वयोगटात वर्गीकरण करण्यात आले आहे. १८-१९ वयोगटातील १३,२५९ मतदार, २०-२९ वयोगटातील सुमारे १.२० लाख, ३०-३९ वयोगटातील १.६६ लाख, ४०-४९ वयोगटातील सुमारे १.३९ लाख, ५०-५९ वयोगटातील सुमारे ९९,००० मतदार आहेत. ६०-६९ वयोगटातील ६१,०००, ७०-७९ वयोगटातील २६,१५० आणि १०,३३८ ८० वर्षांपेक्षा जास्त आहेत.

### मतदारांची संख्या

**२० आणि ४९ च्या दरम्यान एकत्रितपणे सुमारे ४.२५ लाख आहे. हे तरुण मतदार आगामी निवडणुकीत मतदानाच्या पद्धतीच्या दृष्टीने महत्त्वाची भूमिका बजावतील. पनवेल तहसीलदार विजय पाटील यांनी ही माहिती दिली आहे. पनवेल विधानसभा मतदारसंघात सलग चौथ्यांदा एकही उमेदवार विजयी झालेला नाही. प्रत्येक राजकीय पक्षाने आपले उमेदवार बदलले होते किंवा निवडणुका जिंकण्यासाठी नेत्यांनी आपले पक्ष बदलले असल्याने चौथ्यांदा विजय मिळवण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पुढे मोठे आव्हान आहे.**

### आतापर्यंत आमदार

**विद्यमान आमदार प्रशांत ठाकूर भाजपमधून २०१९ आणि २०१४ निवडून आले आहेत. त्याअगोदर ते २००९ मध्ये काँग्रेस पक्षातून निवडून आले होते. शेकापचे नेते, माजी आमदार विवेकानंद पाटील (१९९५, १९९९ आणि २००४) आणि दत्तात्रय पाटील (१९७८, १९८५ आणि १९९०) तर दि.बा. पाटील दोनदा विजयी झाले होते.**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय**
**(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड)**

ज.म.र अर्ज १७/२०२४

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्रीम. दर्शना दिपक पाटील — अर्जदार
रा. बापळे, पो. चिंचोटी
पो. सारळ
ता. अलिबाग, जि. रायगड

विरुध्द

ग्रुप ग्रामपंचायत चिंचोटी, — सामनेवाला
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,
१.अर्जदार हे मौजे बापळे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांचे आजे सासु कै. रुक्मिणी शिमगु पाटील यांचा मृत्यु दि २०/११/१९८४ रोजी मौजे बापळे येथील राहत्या घरी झाला होता.
२. मात्र त्यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत चिंचोटी येथे केलेली नसल्याने त्यांचा मृत्यु दाखला मिळण्यासाठी मृत्यू नोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत चिंचोटी यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि. २५/१०/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि. २०/०/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.

ठिकाण : अलिबाग — सही/-
तारिख : २०/०९/२०२४ — **(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

**जाहीर नोटीस**

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे सातिर्जे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक यांच्याकडून त्यांचे मालकीच्या मिळकती विकत घेण्याचे ठरविले आहे. सदरच्या मिळकती निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| विद्यमान मालक | मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|---|
| १. अनघा अरूण खेडेकर | सातिर्जे ता. अलिबाग जि. रायगड | ११७ | ०-१५-०० पो.ख. ०-०२-०० | ०-२८ |
| | | | एकूण ०-१७-०० पैकी ०-०३-० | ०-०६ |
| २. वर्षा वैभव भट्टे | सातिर्जे ता. अलिबाग जि. रायगड | ११७ | ०-१५-०० पो.ख. ०-०२-०० | ०-२८ |
| | | | एकूण ०-१७-०० | |
| | | | पैकी ०-०२-०० पो.ख. ०-०२-०० एकूण ०-०४-० | ०-०४ |

तरी वर नमूद मिळकतीतील विद्यमान मालकांच्या मालकीच्या मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्युपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्गासह आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध व बिनजोखमी आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. ३/१०/२०२४

**ॲड. विजय अनंत पेढवी**
मु. नांदाईपाडा, पो. झिराड
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९८२२१८६७४०

**जाहिर नोटीस**

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की मौजे जिर्णे, ता.पेण, जि.रायगड येथील खालील वर्णनाची माझे अशिल १. श्री.पद्माकर सिना म्हात्रे, २. सतिश पद्माकर म्हात्रे, ३. करुणा पद्माकर म्हात्रे, ४. क्रांती पद्माकर म्हात्रे यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक श्री. सुहास हरिदास पाटील वगैरे यांच्याकडून रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे

| गाव | सर्व्हे नं./गट नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| जिर्णे | ३६/२ | ३.१५.०० पो.ख. ०.८५.०० एकुण क्षेत्र ४.००.०० | १०.०० |

अशा संपुर्ण मिळकतीपैकी लिहुन घेणार अ.क्र.१.यांनी खरेदी केलेले क्षेत्र ०.२०.०० हे.आर.,लिहुन घेणार अ.क्र.२ यांनी खरेदी केलेले क्षेत्र २.२०.०० हे.आर., लिहुन घेणार अ.क्र.३ यांनी खरेदी केलेले क्षेत्र ०.८०.०० हे.आर., तसेच लिहुन घेणार अ.क्र.४ यांनी खरेदी केलेले क्षेत्र ०.८०.०० हे.आर.असे एकूण क्षेत्र ४.००.०० हे.आर. अशी संपुर्ण मिळकत ही खरेदीखताचा विषय आहे. सदर मिळकत शेती उपयोगासाठी खरेदी करत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ (पंधरा) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडुन दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

टिपः सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

सही /-
ठिकाण: पेण — **ॲड हेमा ज. पाटील (घोडिंदे)**
दि.०३/१०/२०२४ — साई श्रध्दा सबुरी बिल्डिंग बी-विंग, ब्लॉक नं.००२ प्रभु आळी, पेण

**खालापूर नगरपंचायत**
**स्थापना २६ जून २०१५**
**मु.पो.ता. खालापूर जि. रायगड**
**दुरध्वनी क्र. ०२१९२-२७५०१५ पिन नं. ४१०२०२**
**ई-मेल आयडी - cokmckhalapur@gmail.com**

नपंखा/रिट याचिका ४८१/२०२४-२५ — दि. २४/०९/२०२४

**जाहीर सूचना**

मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.२१५/२००५ मधील संकीर्ण आवेदन क्र. १६९९/२०१९ च्या संदर्भात दिलेल्या निकालातील मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने दाखल याचिका क्र.०३/२०२४ वरील सुचनांनुसार नगरपंचायत खालापूर कार्यक्षेत्रातील खालापूर नगरपंचायत कार्यालयाव्दारे नियुक्त Custodian यांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

संरक्षक - **श्री. जयंत कल्याणकर,**
स्वच्छता निरीक्षक, खालापूर नगरपंचायत
मोबाईल नं. ७९७२७८१६६९

पत्ता मु.पो.ता. खालापूर, जि. रायगड
पिन नं. ४२०२०२

सही /-
**मुख्याधिकारी**
**खालापूर नगरपंचायत**

निवडक

## प्रतिभा केणी सेवानिवृत्ती

**सुकेळी :** अलिबाग तालुक्यातील कोकण एज्युकेशन सोसायटीचे प्रभाकर नारायण पाटील माध्यमिक विद्यालयाच्या ज्यांनी या शिक्षण संस्थेमध्ये आपल्या आयुष्यातील गेली ३८ वर्षे सेवा केली अशा कुर्डूस माध्यमिक विद्यालयाच्या गुणवंत शिक्षिका प्रतिभा केणी यांनी आपल्या वयाच्या ५८ व्या वर्षी नियत वयोमानानुसार सेवा पुर्ण करुन सोम.दि. ३० सप्टेंबर २०२४ रोजी सेवानिवृत्त झाल्या. त्यामुळे त्यांचा निरोप व शुभेच्छा समारंभ कुर्डूस विद्यालयात आयोजित करण्यात आला होता.

## शैक्षणिक साहित्य वाटप

**पाली/गोमाशी :** लिनस क्लब आणि लायन्स क्लब न्यू पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने सुधागड तालुक्यातील सिध्देश्वर खुर्द शाळेतील विद्यार्थ्यांना स्कूल बॅग आणि शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मिळाल्यामुळे त्याच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. यामुळे विद्यार्थ्यांना शिकण्याची गोडी निर्माण होऊन गुणवत्ता वाढावी या हेतूने हे साहित्य देण्यात आले. यावेळी सुशिला कुलकर्णी, शशी गुप्ता, विनोद पाटील, जागृती पाटील, प्रणाली पाटील उपस्थित होते.

## आरोग्य कार्यशाळेचे आयोजन

**पनवेल :** स्वीट एंजल्स प्री स्कूल, दिशा महिला मंच, आणि जय दादा युवा मंच यांच्या संयुक्त विद्यमाने मानसिक आरोग्य आणि ताण व्यवस्थापन या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. मानसोपचार तज्ञ डॉ. अमित मेढेकर यांनी या कार्यशाळेला मार्गदर्शन केले. यावेळी मेढेकर यांनी मानसिक स्वास्थ्य टिकवणे आणि ताणतणाव हाताळण्याचे विविध उपाय शिकवले. यावेळी ट्रॅडिशनल मार्शल आर्ट्सचे प्रशिक्षक शिहान पाटणकर यांनी स्वसंरक्षणाचे प्रात्यक्षिके सादर केली.

## कार चालकाचा मृत्यू

**पनवेल :** भरधाव वेगाने कार चालवून हायवेच्या मध्ये असलेल्या करंजाच्या झाडाला कारने धडक दिली. या धडकेत युवान ब्रिजेस सलुजा याचा मृत्यू झाला. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली. युवान ब्रिजेश सलुजा हा कार घेऊन खोपोलीकडून पनवेल असा प्रवास करत होता. दांड फाट्याच्या पुढे पनवेल लेनवर अंदाजे सातशे मीटर अंतरावर त्याची गाडी भरधाव वेगाने आली आणि हायवेच्या मध्ये असलेल्या करंजाच्या झाडाला जाऊन ठोकर मारून अपघात झाला.

## विद्यार्थ्यांना वह्या वाटप

**माणगाव :** विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाकरिता प्रतिवर्षी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देणाऱ्या गौरीशंकर मिठाईवाले परेल मुंबई यांच्याकडून माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयातील विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. कृष्णा महाडिक यांच्या माध्यमातून प्रतिवर्षी रायगड जिल्ह्यातील विविध शाळांना शैक्षणिक साहित्याची मदत देण्यात येते. यावर्षीही प्रदक्षिण रायगड जिल्ह्यातील २४ शाळांमध्ये ३५०० विद्यार्थ्यांना वह्या व खाऊचे वाटप करण्यात आले.

# वेणगाव ग्रामपंचायतीचे स्वच्छतेकडे दुर्लक्ष

**■ गावात गटारे तुंबली**
**■ धूर फवारणी यंत्र वापराविना**

**। वेणगाव । वार्ताहर ।**

स्वच्छ भारत अभियानाला वेणगाव ग्रामपंचायत केराची टोपली दाखवत असल्याने चित्र पाहायला मिळत आहे. राज्य शासनाच्या वतीने संपूर्ण जिल्ह्यासह तालुक्यात स्वच्छ शहर गाव असा नारा देत स्वच्छ भारत अभियान चालवत आहेत. अनेक ठिकाणी स्वच्छतेवर भर देऊन शासनाच्या वतीने स्वच्छता मोहिम राबविण्यात येत असून कर्जत तालुक्यातील वेनगाव ग्राम पंचायत स्वच्छतेकडे दुर्लक्ष करीत असल्याचे चित्र पाहायला मिळत असून, वेनगाव ग्रामपंचायतीत मात्र या स्वच्छ भारत अभियानाचे तीनतेरा वाजल्याचे दिसत आहे.



ग्रामपंचायत परिसरात काही ठिकाणी गटारांचे सांडपाणी साचून रस्त्यावर येत आहे. त्यामुळे येथील गटारे तुंबलेल्या अवस्थेत दिसून येत आहेत. काहीमहिन्यापूर्वीग्रामपंचायत परिसरात रोगराई पसरू नये याकरिता नागरिकांच्या सुरक्षितेच्या दृष्टीने मच्छर व इतर कीटकनाशक जीव-जंतू मारण्यासाठी ग्रामपंचायतीमध्ये धूर फवारणी मशीन मागविण्यात आणली आहे.

सध्याचे चित्र पाहता पूर्ण पावसाला संपायला आला असून गावात अद्यापपर्यंत कुठेच मशीनद्वारे फवारणी केली नसल्याने ती मागण्यात आलेली मशीन ग्रामपंचायत कार्यालयात तशीच वापराविना पडून आहे.

त्यामुळे गावात भरमसाठ प्रमाणात मच्छर वाढले आहेत. या मच्छरमुळे गावात मलेरिया- डेंग्यू सारखा आजार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ग्रामपंचायतीच्या अशा दुर्लक्षित गलथान कारभारामुळे येथील ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात येवू शकते. वेणगाव गावातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगरकडे जाणाऱ्या रस्त्याच्या दोन्ही बाजूचे गटार पूर्ण भरले आहे. येथील रस्त्याच्या बाजूस पावसाळ्यात गवत, झाडी-झुडपे वाळलेली आहेत. हे स्वच्छ करण्यास सदर ग्रामपंचायतीला वेळ नाही. येणारे सांडपाणी रस्त्यावर वाहत असल्याने येथून जाताना दुर्गंधी येते आहे. गटार भरल्याने सांडपाण्याची मोठी समस्या निर्माण झाली आहे. गावातील अनेक गटारांची हीच अवस्था आहे, मात्र ग्रामपंचायत डोळ्यावर पट्टी लावून बसली असल्याचे जाणवते.

याबाबत येथील ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीत अनेक वेळा कळवून सुध्दा दुर्लक्ष करीत आहे. गावातील गटारे स्वच्छ करून रस्त्यावर वाडलेले गवत झाडी-झुडपे कापून संपूर्ण गावात मच्छर फवारणी करण्यात यावी. गावात स्वच्छतेबाबत उद्‌भवणाऱ्या समस्यांचे निवारण करण्यात यावे अशी येथील ग्रामस्थांची मागणी होत आहे.

# घटस्थापनेसाठी मातीला मागणी

## १० रुपये ग्लास या दराने बाजारात विकली जातेय माती

**। पनवेल । वार्ताहर ।**

नवरात्री उत्सवादरम्यान घरोघरी घटस्थापना करण्यात येते.घट बसवण्यासाठी मातीची गरज लागते.ही गरज लक्षात घेऊन पनवेलच्या बाजारात सध्या मातीची विक्री केली जात आहे. १० रुपयात ग्लास भर माती विकली जात असून मातेचे भक्तदेखील माती खरेदी करून नेण्याला पसंती देत आहेत. गुरूवारी (दि.३) पासून नवरात्रीला सुरूवात होणार आहे.या दिवसात मातेचा जागर करण्यासाठी लागणाऱ्या पूजेच्या साहित्यानी बाजार सजले आहेत.

साहित्याची खरेदी करण्यासाठी भक्तगणांची बाजारात लगबग सुरू झाली आहे. घटाला लागणाऱ्या साहित्य, फळे, फुले, केळीची पाने, सुपारी, हळद कुंकू, कडधान्य त्याच बरोबर घटस्थापनेसाठी मातीचे घट आणि मातीही लागते.पूर्वी माती हवी तितकी आणि फुकट मिळत होती.मात्र शहरी भागात वाढलेल्या सिमेंटच्या जंगलात माती मिळणे अवघड झाले आहे. त्यातच आजच्या ऑनलाईन युगात घरबसल्या हवं ते खरेदी करता येत असल्याने घरात बसून खरेदीची सवय लागली असल्याने माती शोधत इकडे तिकडे फिरण्यापेक्षा बाजारात सहज उपलब्ध असलेली माती खरेदीला पसंती दिली जात आहे. यातूनच विक्रेत्यांना देखील रोजगार उपलब्ध होत असून, एक ग्राहक कमीत कमी तीन ते चार ग्लास माती विकत घेऊन जात असल्याची माहिती कळंबोली वसाहतीत माती तसेच नवरात्री उत्सवाकरता लागणाऱ्या साहित्याची विक्री करणाऱ्या विक्रेत्याने दिली.



### मातीच्या घटाची ऑनलाईन विक्री

**घट स्थापनेसाठी लागणारे मातीचे घट सध्या बाजारात उपलब्ध आहेत. त्याच सोबत ॲमेझॉन, मेशो सारख्या ऑनलाईन वस्तू विक्री करणाऱ्या साईडवरदेखील २०० रुपयांपासून ५०० रुपयांपर्यत मातीचे सुबक आणि आकर्षक घट विक्रीसाठी उपलब्ध आहेत.**

# इमारतीतील गाळ्यांवर कारवाई

**। नवीन पनवेल । वार्ताहर ।**

मालेवाडी सुकापुर येथील श्री युनिटी कॉम्प्लेक्स येथे नैनाने बुधवारी तोडक कारवाई केली. मात्र ही कारवाई अर्धवट केल्याने याकडे संशयाने पाहिले जात आहे.

पनवेल तालुक्यातील २३ गावांमध्ये नैना येऊ घातलेली आहे. नैनाची कोणतीही परवानगी न घेता सुकापुर, आकुर्ली, मालेवाडी, विचुंबे, देवद, चिपळे, आदी परिसरात अनधिकृत इमारती उभ्या राहत आहेत. अनेक अनधिकृत इमारतींची कामे वेगाने सुरू आहेत. मात्र नैना याकडे डोळेझाक करत असल्याचे दिसून येत आहे.

इमारतीचे काम सुरू असताना नैनाचे अधिकारी यावर कारवाई करत नाहीत. इमारत उभी राहिल्यानंतर फक्त दाखवण्यासाठी थोडीफार कारवाई केली जाते. त्यामुळे नैनाकडे संशयाच्या नजरेने पाहिले जात आहे. यात आर्थिक व्यवहार झाले असल्याचे बोलले जात आहे.

गरीब नागरिक आपल्या आयुष्याची जमापुंजी घर घेण्यासाठी लावतो. त्यातच अनधिकृत इमारतीत घर घेतल्यानंतर त्याची आयुष्याची पुंजी वाया जाते. मात्र नैना-सिडकोला याचे काहीही देणे घेणे नसल्याचे दिसून येत आहे. दोन आठवड्यांपूर्वी मालेवाडी सुकापुर येथील लक्ष्मी पब्लिक स्कूल समोरील इमारतीवर नैनाचे अधिकारी कारवाईसाठी आले होते मात्र केवळ चार ते पाच कॉलम तोडून ही अर्धवट कारवाई करण्यात आली होती.

बुधवारीदेखील मालेवाडी येथे अशाच प्रकारची अर्धवट कारवाई करण्यात आली. अनधिकृत इमारतींवर अर्धवट कारवाई करून नैना प्राधिकरण काय साध्य करू पाहत आहे हे सामान्य नागरिकांना समजत नाही. आर्थिक व्यवहारामुळे अशा प्रकारे अर्धवट कारवाई होत जात असल्याचा आरोप केला जात आहे.

अनेक ठिकाणी कोणत्याही परवानगी न घेता इमारती उभ्या राहत आहेत. त्यामुळे नागरिकांची फसवणूक होत असल्याचे समोर आले आहे. मालेवाडी येथे नैनाकडून कारवाईचा केवळ दिखावा करण्यात आला. जून महिन्यात विचुंबे येथे देखील अर्धवट कारवाई करण्यात आली होती. तर एप्रिल महिन्यात सुकापूर येथील मौर्या नामक बांधकाम व्यावसायिक बांधत असलेल्या ४ ते ५ माळ्याची स्वप्नपूर्ती सोसायटी या इमारतीवर देखील कारवाई न करता अतिक्रमण विभाग माघारी गेले होते. या बाबत नैना अधिकाऱ्यांवर संशय व्यक्त केला जात आहे.



● अलिबाग येथील प्रभाकर महादेव बोर्लीकर यांचा २१ दिवसांचा राजा.

# डेंग्यू रोखण्यासाठी नेरळ ग्रामपंचायतीचा पुढाकार

## ■ डासांची साखळी तोडण्यासाठी उपाययोजना सुरु

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ गावात डेंग्यूचे संशयित रुग्ण आढळून आल्यावर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सूचनेनुसार नेरळ ग्रामपंचायत कडून डेंग्यूचे डासांची साखळी तोडण्यासाठी जोरदार प्रयत्न केले जात आहेत.नेरळ ग्रामपंचायत रस्त्यावर उतरून धूर फवारणी आणि स्वच्छता कामांसाठी आग्रही असल्याची दिसून आली.

दरम्यान नेरळ गावात डेंग्यूचे चार संशयित रुग्ण असून दोन रुग्ण उपचार घेवून विश्रांती घेत आहे.तर नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्राकडून डेंग्यू सदृश रुग्ण आढळून आलेल्या ठिकाणी कंटेनर सर्वे सुरू आहेत.



नेरळ गावात १३ सप्टेंबर रोजी डेंग्यू झाल्याने तरुणाचा मृत्यू झाला होता.त्याच भागातील सहा व्यक्ती डेंग्यू सदृश आजाराने त्रस्त आहेत. त्यातील दोन संशयित रुग्ण खासगी रुग्णालयात उपचार घेवून घरी परतले असून त्यातील एक रुग्ण आपल्या गावी उत्तर प्रदेश येथे विश्रांती साठी पोहचला आहे.आज नेरळ मध्ये चार डेंग्यू सदृश रुग्ण असून त्यात दोन रुग्ण नेरळ गावातील खासगी रुग्णालयात तर एक रुग्ण खोपोली येथील रुग्णालयात आणि एक महिला रुग्ण अन्य खासगी रुग्णालयात उपचार घेत आहेत.

# माहितीचा अधिकार दिन साजरा

**खोपोली :** वसंत देशमुख मेमोरियल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्स तसेच रायगड पोलीस व नार्को-को-ऑर्डिनेशन सेंटर समिती रायगड यांच्या संयुक्त संकल्पनेतून माहितीचा अधिकार अधिनियम दिनानिमित्ताने नशा मुक्तीवर निबंध स्पर्धा, पोस्टर्स स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी खालापूर उपविभाग पोलिस अधिकारी विक्रम कदम यांची प्रमुख उपस्थिती होती.

## चित्रकार पराग बोरसे यांच्याकडून

# अमेरिकन चित्रकारांना चित्रकलेचे धडे

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

पुरस्कार सोहळ्यासाठी अमेरिकेत गेलेले आंतरराष्ट्रीय ख्यातीचे चित्रकार पराग बोरसे यांच्यावर अमेरिकेतील चित्रकार देखील फिदा आहेत. तेथील मराठी भाषिक चित्रकार यांनी पराग बोरसे यांना चित्रकलेचे धडे देण्याची विनंती केली. त्यानंतर बोरसे यांनी अमेरिकेतील मराठी चित्रकारांना चित्रकलेचे धडे दिले.



भारतीय कलाकार पराग बोरसे यांना अमेरिकेतील अनेक सन्माननीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आह. न्यू जर्सीच्या पेस्टल सोसायटीने रोजी मेडिसन हाऊस, २५, कुक एव्हेन्यू, मेडिसन, न्यू जर्सी येथे एका पेस्टल पोर्ट्रेट कार्यशाळेसाठी पराग बोरसे यांना आमंत्रित केले होते. मराठी भाषिक अमेरिकास्थित १४ विद्यार्थ्यांनी चित्रप्रक्रिया समजून घेण्यासाठी आणि शिकण्यासाठी भाग घेतला होता. पराग बोरसे यांनी लाल रंगाचा पगडी परिधान केलेल्या आणि मोठ्या मिशा आणि दाढी असलेल्या महाराष्ट्रातील एका गावकऱ्याच्या चित्राचे प्रात्यक्षिक दिले आहे. सर्व विद्यार्थी खूप प्रभावित झाले आहेत. त्यांच्याकडून भविष्यात देखील भारतीय संस्कृतीबद्दल अधिक जाणून घेण्यास उत्सुक असल्याचे दिसून आले.

## स्थानिक नागरिकांना मंदिर समितीवर घेण्यास विश्‍वस्त समिती सकारात्मक

# महड देवस्थान समितीचा तिढा सुटणार

**। रसायनी । राकेश खराडे ।**

अष्टविनायकांपैकी एक स्थान असणाऱ्या महड येथील श्री वरद विनायकाच्या मंदिर विश्‍वस्त समितीवर स्थानिक महड येथील ग्रामस्थांचे सदस्य असावेत अशी मागणी मागील अनेक वर्षांपासून होती. याबाबत बैठक पार पडली होती.त्याला अंतिम स्वरूप देण्यासाठी ग्रामस्थ व मंदिर समिती यांची संयुक्त बैठक पार पडली असून या बैठकीत ग्रामस्थ ठरवून देतील, त्या सदस्य समितीला समितीवर घेण्यासाठी सहकार्य करील असा तोडगा काढून निर्णय घेतल्याने कमिटीवर नवीन सदस्य घेण्याचा तिढा सुटणार आहे.



महड येथील श्री वरदविनायकाचे स्थान असल्याने या गणपती बाप्पाचे दर्शन घेण्यासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भक्तगण येत असतात. त्यामुळे या पवित्र स्थानाच्या मंदिर कमिटीवर स्थानिक महड येथील सदस्य असावेत अशी मागणी ग्रामस्थांनी केल्याने याबाबत अस्तित्वात असणाऱ्या विश्‍वस्त समितीकडे मागणी केल्याने या ग्रामस्थांच्या मागणीला अंतिम स्वरूप देण्यासाठी सोमवार ३० सप्टेंबर रोजी मंदिराच्या सभागृहात बैठक संपन्न झाली. यात मंदिर समितीवर स्थानिक सदस्य समितीवर घेण्यासाठी अस्तित्वात असणारी समिती सहकार्य करेल. यासाठी नवीन घटना तयार करण्यासाठी ग्रामस्थ व मंदिर विश्‍वस्त समिती समन्वय साधून तयार करेल व जे कागदपत्र पुरावे लागणार असतील ते धर्मदाय आयुक्त कार्यालयात नियमानुसार सादर करावेत त्याला कोणाचाच विरोध नसेल अशी भूमिका समितीने घेतल्याने समाधान व्यक्त होत आहे.

> **महड देवस्थान हे महड गावात आहे, त्यामुळे या विश्‍वस्त समितीवर स्थानिक सदस्य असावेत अशी मागणी आम्ही ग्रामस्थांनी केली होती. त्यानुसार झालेल्या बैठकीत मंदिर समितीने सकारात्मक भूमिका घेऊन जे सहकार्य आवश्यक आहे ते दिले जाईल व घटना दुरुस्ती मध्ये ही ग्रामस्थ आणि विश्‍वस्त कमिटी एकत्र बसून तयार केली जाईल असे लेखी पत्र ग्रामस्थांना दिले आहे.**
> **– मिलिंद पाटील, स्थानिक ग्रामस्थ महड**

> **महड देवस्थान विश्‍वस्त समितीवर स्थानिक सदस्य असावेत अशी मागणी ग्रामस्थांनी केल्याने या नागरिकांच्या मागणीचा आदर करीत नियमानुसार ग्रामस्थांना या विश्‍वस्त समितीत सामावून घेण्यासाठी सहकार्य करणार.**
> **– ॲड.मोहिनी वैद्य, कार्याध्यक्षा, महड देवस्थान विश्‍वस्त समिती**



कृषीवल
रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# युध्द थांबत नाही, पापा

लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात भाजपच्या एका जाहिरातीची जोरदार चर्चा झाली होती. युक्रेनमधील भारतीय विद्यार्थ्यांना बाहेर पडण्याला वेळ मिळावा यासाठी तेथील युध्द नरेंद्र मोदी यांच्या विनंतीवरून काही काळ थांबवण्यात आले होते, असा विनोदी दावा भाजपचे नेते करीत होते. त्याचनुसार युक्रेनमधील एक विद्यार्थिनी मोदीने युध्द रुकवा दिया पापा असे आपल्या वडिलांना सांगत असल्याचे या जाहिरातीत दिसले होते. या जाहिरातीवरून भाजपची तुफान टिंगल झाली. इतकी की शेवटी ही जाहिरात काढून घ्यावी लागली. तिकडे युक्रेन युध्द चालू असतानाच पश्चिम आशियामध्ये पुन्हा नव्याने भडका उडाला आहे. इस्रायलच्या लेबनॉनवरील चढाईला प्रत्युत्तर म्हणून मंगळवारी इराणने इस्रायलावर दोनशे क्षेपणास्त्रे डागली. यामुळे नेमकी किती हानी झाली हे स्पष्ट नसले तरी इस्रायलची गुंडगिरी बाकीचे देश निमूटपणे सहन करणार नाहीत हे स्पष्ट झाले. मोदीच नव्हे तर कोणीही एक नेता बटन दाबून लाईट चालू किंवा बंद केल्याप्रमाणे युध्द चालू किंवा बंद करू शकतो ही कल्पना किती मूर्ख आहे याचा प्रत्यय या निमित्ताने पुन्हा एकवार येईल. गेल्या वर्षी सात ऑक्टोबरला पॅलेस्टिनी हमास संघटनेने इस्रायलमध्ये घुसून शेकडो नागरिकांचे अपहरण केले होते. त्यापैकी अनेक जण अजूनही दहशतवाद्यांच्या ताब्यात आहेत. इस्रायलच्या स्थापनेपासून अरब व मुस्लिम देशांचा त्याला विरोध आहे. मात्र आतापर्यंत इस्रायलच्या भूमीत घुसून अशी कारवाई कोणीही करू शकले नव्हते. इस्रायलमध्ये सक्तीची लष्करी सेवा आहे. आपण सदैव लढाईसज्ज राहायला हवे अशी देशातील लोकांना शिकवण मिळालेली असते. शिवाय, अमेरिका आणि युरोप हे वाटेल तितका शस्त्रपुरवठा करायला तयार असतातच. त्यामुळे पॅलेस्टाईन, इजिप्त, सौदी इत्यादींची डाळ कधी शिजू शकली नव्हती. गेल्या वर्षीच्या हल्ल्याने इस्रायलच्या त्या अभिमानाच्या पार ठिकऱ्या उडाल्या. त्यातून या भागात युध्द पेटणार हे उघड होते. आता त्याचा विस्तार होऊ लागला आहे ही चिंतेची बाब आहे.

## लेबनॉन बेचिराख

इस्रायलची स्थापना १९४८ मध्ये झाली. दुसऱ्या महायुध्दानंतर अमेरिकी व युरोपातील देशांनी ज्यूंचे हे राष्ट्र निर्माण केले. मात्र हे सर्व परभारे पॅलेस्टिनी मुस्लिमांच्या भूमीवर उभे झाले. आता तर पॅलेस्टिनींची अवस्था, असुनि खास मालक घरचा, म्हणती चोर ज्याला अशी झाली आहे. अत्यंत गैरसोयीच्या गाझा पट्टीमध्ये ते कोंबले गेले आहेत. याच गाझा पट्टीमधून पॅलेस्टिनींचे सरकार चालते. तसेच हमाससारख्या अतिरेकी संघटनाही तेथे वावरतात. त्यांनीच गेल्या वर्षीचा हल्ला केला आणि इस्रायलला संधी मिळाली. त्याने गाझा पट्टीवर गेल्या वर्षभरात तुफानी बाँबहल्ले व प्रत्यक्ष चढाया करून लक्षावधी लोकांना मारले आहे. हा प्रदेश जवळपास बेचिराख झाला आहे. गेल्या काही महिन्यांपासून त्याने लेबनॉनकडे लक्ष वळवले. तेथे हेझबुल्लाह हा एक प्रमुख राजकीय पक्ष आहे. तशीच एक अतिरेकी संघटनाही आहे. या संघटनेने इस्रायलला अनेकदा शह दिला आहे. तिचा बीमोड करण्यासाठी इस्रायलने गेल्या काही दिवसांपासून लेबनॉन व राजधानी बैरूतवर तुफानी हल्ले केले. गेल्या आठवड्यात अशाच एका हल्ल्यात हेझबुल्लाहचा प्रमुख हसन नसरल्ला ठार झाला. जमिनीखाली खूप खोल अशा तळघरात लपलेला असूनही इस्रायलने त्याला मारला. हेझबुल्लाहचे अनेक नेते गेल्या सहा महिन्यात मारले गेले आहेत. आता तर इस्रायल प्रत्यक्ष त्या देशाच्या सीमेतही घुसला असून प्रत्यक्ष युध्दच सुरू झाल्यात जमा आहे. अमेरिका व इतर देश इस्रायलला तोंडदेखले सबुरीचा सल्ला देत असले तरी दुसरीकडून त्याला शस्त्रपुरवठा चालूच आहे. शिवाय इस्रायलची नाकेबंदी होऊन युध्द थांबावे असे एकही पाऊल या देशांनी उचललेले नाही. बांगलादेश मुक्ती संग्रामाच्या वेळी याच अमेरिकेने भारताविरुध्द लढण्यासाठी आपले सातवे आरमार म्हणजे नौदल पाठवले होते. लेबनॉनवरील हल्ल्यांमुळे दहा लाख लोक बेघर व विस्थापित झाले असून पाणी, वीज, इस्पितळे यांची बोंब झाली आहे.

विहूर ग्रामपंचायत हद्दितील विहूरसह बौद्धवाडी आणि मोरा या गावांची सुमारे तीन हजार लोकसंख्या आहे. या परिसरात बाहेरून आलेल्या सुमारे चार-पाचशे लोकांची वस्ती आहे. प्रत्येक घरामध्ये मोबाईल आहेत. पण मोबाईल असुनही ग्राम स्थांना नेटवर्क अभावी वंचित राहावे लागत आहे. या परिसरात अनेक शैक्षणिक संस्था, शिक्षक, डॉक्टर, शासकीय, निमशासकीय, खाजगी कार्यालय व कर्मचारी आहेत. सर्व शैक्षणिक संस्था ऑनलाईन अभ्यास घेत असल्यामुळे विद्यार्थ्यांचे देखील शैक्षणिक नुकसान होत आहे. तसेच, हॉटेल-रिसॉर्ट सुद्धा आहेत. यामुळे या ठिकाणी पर्यटकांची ये-जा असते. येथील पेट्रोल पंपावर येणाऱ्या ग्राहाकांची व पर्यटकांची ऑनलाईन पैसे भरण्यासाठी मोठी गैरसोय होत आहे.

## चोरढे गावात ग्राम स्वच्छता अभियान

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**
मुरूड तालुक्यातील चोरढे गावातील रायगड जिल्हा परिषद शाळेत पालकांच्या व ग्रामस्थांच्या सहकार्याने मंगळवारी (दि.१) ग्राम स्वच्छता अभियान साकारण्यात आले होते. यावेळी सरपंच तृप्ती घाग व अध्यक्ष पची यांच्या मार्गदर्शनात शाळेचा परिसर, गावातील रस्ते, स्मशानभूमी व त्या बाजूचा परिसर, गावात वाढलेली छोटी झाडे-झुडपे काढून स्वच्छता करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांबरोबरच पालक व ग्रामस्थांनी श्रमदानात सहभाग घेतला होता. या स्वच्छता अभियानाला संदीप घाग, तृप्ती घाग, ऋत्विक घाग, रवींद्र भोपी, सुरेश तांबडे, सुनील घाग, लक्ष्मण काचारे, हेमंत दूकले, नितेश घाग, प्रमोद चोरडेकर, वैष्णवी आमलिकर, माधुरी शेडगे, मीनाक्षी घाग, गंगाराम भोईर, जनी पाटील, विद्या शेडगे, स्वाती टावरी, रेणुका घाग, जयश्री पंची, हिरा भोईर आर्दीनी सहकार्य केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संगीता भगत, विजय जाधव, राजेंद्र नाईक, रमेश सुभेदार, प्रतिभा वर्तक, इर्शाद बैरागदार, जयश्री पची यांनी नियोजन केले होते.

## मोफत नेत्रतपासणी शिबीर संपन्न

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**
ऑक्टोबर सेवा सप्ताहाच्या औचित्याने अलिबाग लायन्स क्लबच्यावतीने चौलच्या प्राचीन सुंदर नारायण मंदिरात मोफत नेत्रतपासणी आणि शस्त्रक्रिया शिबीर संपन्न झाले. यावेळी शंभराहून अधिक नेत्ररुग्णांची तपासणी करण्यात आली. यात विविध प्रकारच्या नेत्र समस्येने ग्रासलेल्या ३८ रुग्णांना अलिबागच्या लायन्स हेल्थ फाउंडेशन येथे मोफत शस्त्रक्रिया आणि उपचारांसाठी संदर्भित करण्यात आले. यात मोतीबिंदूचे १०, रेटिना १ तर इतर ८ नेत्ररुग्णांचा समावेश होता.



यावेळी प्रमुख उपस्थितांमध्ये सेकंड डिस्ट्रिक्ट व्हॉइस गव्हर्नर ला. प्रवीण सरनाईक, साईट फर्स्टचे डिस्ट्रिक्ट चेअरपर्सन एस.एन. मूर्ती, रिजन चेअरपर्सन विजय वनगे, झोन चेअरपर्सन प्रितम गांधी, अलिबाग लायन अध्यक्ष ॲड. गौरी म्हात्रे, महेश कवळे, अंकिता म्हात्रे, अतुल वर्तक, सर्वश्री कवळे, अनिल म्हात्रे, अविनाश राऊळ, महेंद्र पाटील, संतोष पाटील, गिरीश म्हात्रे, भगवान मालपाणी, संजय मोरणकर, मनोज ढगे, प्रकाश देशमुख, चित्रा वर्तक, डॉ. सुधीर पाटील, लायन्स हेल्थ फाउंडेशन अलिबागचे डॉक्टर्स, तंत्रज्ज्ञ, ज्येष्ठ नागरिक संघटना चौलचे अध्यक्ष सतीश मनोहर, राईलकर, सुधीर नाईक आदि मान्यवरांसह लायन्स सभासद, ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारीवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग
- वरसोली, रायगड आदर्श नगर येथे ४.५ गुंठेचे (एकूण ३६ गुंठे), ८ प्लॉट एकत्रित अथवा वेगवेगळे विकणे आहेत. अपेक्षित किंमत ₹.५५ लाख प्रत्येकी, एकत्रित ४.४ कोटी संपूर्ण चेक पेमेन्ट - ९८२२२५७९२९
- किहीम, रायगड समुद्रकिनाऱ्यापासून ३५० मीटर अंतरावर ३५० मिटरचा NA प्लॉट विकणे आहे. अपेक्षित किंमत ₹.९० लाख बंगल्यासाठी योग्य - ९८२२२५७९२९
- चौल, रायगड मुख्य रस्त्यावर, मुखरी गणपतीजवळ १८ गुंठे बागायत आणि ५५ गुंठे शेती (७३ गुंठे) जमीन एकत्रित विकणे आहे. अपेक्षित किंमत रुपये ७ कोटी - ९८२२२५७९२९
- IRCED मायक्रो फायनान्स कंपनीसाठी वावे, पेण, रोहा येथे महिला कर्ज अधिकारी नेमणे आहे. विवाहित महिलांना प्राधान्य. दुचाकी आवश्यक. संपर्क ८३२९५५११९१/८६०५२०४२१६
- अलिबाग शहर येथील हॉस्पिटलच्या कामासाठी मावशीची (आया) आवश्यकता आहे. संपर्क- ९८२२४०९८४९, ९८५०३४८५०६.
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. १.रिसेप्शन (पेमेंट-९०००-१३००० अनुभवानुसार) किमान १-२ वर्षे अनुभव आवश्यक. २. कॉंटिनेंटल कुक (पेमेंट-२२००० आणि वर अनुभवानुसार) किमान-५ वर्षे अनुभव आवश्यक. अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळात संपर्क साधावा आणि व्हॉट्सॲपवर रेझ्युमे शेअर करावा. मोबाईल- ७५५९१८४६१२.
- 'इंद्रप्रस्थ' करीता रात्रपाळीच्या कामाकरीता माणूस पाहिजे. संपर्क : ८१८०८६१२३४, ८१८०८५१२३४

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

### एमएसआरडीसीने घेतली अपघातांची दखल
# दुभाजकांवर उभारले संरक्षक कठडे

**। पनवेल । वार्ताहर ।**
**मुंबई-पुणे जुन्या राष्ट्रीय महामार्गावरील दुभाजकांवर असलेले लोखंडी संरक्षक कठडे तुटून पडल्याने गेल्या आठवडाभरात अनेक वाहनांच्या अपघातांच्या घटना घडल्या आहेत. तसेच, मुसळधार पडणाऱ्या पावसामुळे अपघातासोबत जखमींच्या सख्येत देखील वाढ होत होती. यावेळी सामाजिक कार्यकर्ते कांतीलाल कडू यांच्या विनंतीची एमएसआरडीसीने दखल घेत तात्काळ संरक्षक कठडे उभारले आहेत.**



पनवेल तालुक्यातील पळस्पे फाट्यावरून मुंबई-पुणे जुन्या राष्ट्रीय महामार्गावरून जाताना डेरवली गावाजवळ काही वाहनांची धडक बसून येथील संरक्षक कठडे तुटले होते. यात पावसाच्या थैमानाने रात्रीच्या अंधारात रस्त्याचा अंदाज न आल्याने अनेक वाहने तुटलेल्या संरक्षक कठड्याच्या मोकळ्या जागेतून आरपार जात होती. यामुळे मोठ्या दुर्घटनेची शक्यता निर्माण झाली होती. येथे शोभेची झाडे लागवडीकरिता रुंद दुभाजक तयार केल्याने बऱ्यापैकी मोकळी जागा निर्माण झाली होती. तसेच, पावसामुळे चिखलमय स्थिती झाली होती. यामुळे अपघाताचे प्रमाण आपोआप वाढले आणि वाहतुक कोंडीत देखील भर पडत होती.

यासंदर्भात धैर्यशील नागावडे यांनी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांना माहिती देऊन दुभाजकांवरील तुटलेले संरक्षक कठडे तातडीने नव्याने बांधण्याची मागणी केली. आठवडाभराच्या पाठपुराव्यानंतर आश्वासनाचा फक्त डोंगर उभा राहिला होता. अखेर त्यांनी सामाजिक कार्यकर्ते कांतीलाल कडू यांना सांगितले असता त्यांनी एमएसआरडीसीचे अभियंता सचिन देवरे यांना संरक्षक कठडे तातडीने बसवण्याची विनंती केली. याची तात्काळ दखल घेत दुसऱ्याच दिवशी एम एसआरडीसीकडून साहित्याची जुळवाजुळव करतदोन दिवसांत संरक्षक कठडे बसविण्यात आले. याबद्दल कांतीलाल कडू यांचे पनवेलकरांनी आभार मानले आहेत.

## भाऊराव म्हामुणकर यांचे निधन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**
जय भवानी नागरी सहकारी पतसंस्थेचे उपाध्यक्ष अभय म्हामुणकर यांचे वडील भाऊराव म्हामुणकर यांचे शनिवार दि.२८ सप्टेंबर रोजी निधन झाले. निधनासमयी ते ७६ वर्षांचे होते.



अंत्यसस्कारावेळी अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, ॲड. मिलिंद चव्हाण, हर्षल पाटील, बाळू पवार, नरेश सावंत, उल्हास पवार, अनिल गोळे आदी उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना-नातवंडे असा परिवार आहे. भाऊराव म्हामुणकर यांचे दहावे सोमवारी (दि.७), तर उत्तरकार्य गुरुवारी (दि.१०) होणार आहेत.

# संविधानदिनी जेएनपीए चॅनेल बंद आंदोलन

## ■ शेवा कोळीवाडा विस्थापित महिला संघटनेतर्फे इशारा

**। उरण । वार्ताहर ।**

जेएनपीटी प्रकल्प विस्थापित शेवा कोळीवाडा २५६ कुटुंबांनी ३९ वर्षे उलटूनही शासनाचे मापदंडाने मंजूर असलेले पहिले पुनर्वसनाचे काम चालू करण्यासाठी दि. २ ऑक्टोबर रोजी जेएनपीटी चॅनेल बंद आंदोलन जाहीर केले होते. ते पुढे ढकलून संविधानदिनी म्हणजेच २६ नोव्हेंबर रोजी जेएनपीए (जेएनपीटी)चे समुद्रातील मार्ग अडवून चॅनेल बंद आंदोलन करणार असल्याची माहिती शेवा कोळीवाडा विस्थापित महिला संघटनेतर्फे देण्यात आली आहे.

यासंदर्भात उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), रायगड, सहाय्यक पोलीस आयुक्त, न्हावा शेवा पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मोरा पोलीस ठाणे यांनी विस्थापितांसोबत जेएनपीटी प्रकल्प विस्थापित शेवा कोळीवाडा संक्रमण शिबिरातील हनुमान मंदिरात दि. १ ऑक्टोबर रोजी बैठक घेतली. त्या बैठकीत ठरल्याप्रमाणे जेएनपीएने जेएनपीटी कामगार वसाहतीला लागून जसखार व फुंडे गाव नकाशातील जेएनपीए प्रकल्प विस्थापित शेवा कोळीवाडा गावातील २५६ कुटुंबांचे शासनाचे मापदंडाने दि.१२ नोव्हेंबर १९८२ ते १२ मार्च १९८७ मध्ये पायरी-पायरीने मंजूर असलेले पहिले पुनर्वसन करण्यासाठी दिलेल्या विकसित जमिनीत दि. ३ ऑक्टोबरपासून नागरी सुविधेची कामे सुरू करणे मान्य केले, शेवा कोळीवाडा गावठाणाच्या नकाशास शेवा भाग ३ देऊन २५६ भूखंडांना व नागरी सुविधेच्या भूखंडांना स्वतंत्र गाव नमुना ७/१२ ना शेवा सर्व्हे नंबर देऊन प्रत्येक भूखंडधारकांना शेवा सर्व्हे नंबरचे ७/१२ वाटप करणे मान्य केले. पुनर्वसनाची सर्व कामे मान्य केली ती दि.१५ नोव्हेंबर २०२४ रोजीच्या आत पूर्ण करण्याची लेखी हमी मा.उप जिल्हाधिकारी (पुनर्वसन), रायगड व जेएनपीए व्यवस्थापन यांच्या दोघांच्या सहीने दि. १ नोव्हेंबर २०२४ रोजी दिली आहे. त्या दिलेल्या कालावधीपुरता विश्वास ठेवून विस्थापितांनी दि. २ ऑक्टोबर रोजीचे जेएनपीटी चॅनेल बंद आंदोलन पुढे ढकलून संविधान दिनी करण्यात येणार आहे.

# परतीच्या पावसाने गोठ्याचे नुकसान

**। पाताळगंगा । वार्ताहर ।**

हस्त नक्षत्र सुरु झाल्यापासून शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले असून, शेतकरी हवालदिल झाला आहे. मात्र, दरवर्षीप्रमाणे हा परतीचा पाऊस शेतकरी यांच्या मुळावर उमटत असल्याचे दृश्य पाहावयास मिळत आहे. शेती दाण्याने बहरली असून, मात्र आता ती मातीमोल होत असल्याचे पाहावयास मिळत आहे. त्याचबरोबर ह्या परतीच्या पावसाचा फटका तळवळी येथील शेतकरी देविदास मालकर यास बसला असून, त्यांच्या घरच्या पाठीमागे असलेला गुरांचा गोठा पडल्यामुळे मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने या वाड्यात गुरे नसल्यामुळे मोठा अनर्थ टळला.

सायंकाळ होताच अचानकपणे येत असलेला हा परतीचा पाऊस नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत आहे. घराच्या पाठीमागे असलेल्या या बेडा हा कौलारु असून, त्याचबरोबर या बेड्याला उत्तम प्रकाराचे लाकूड असल्यामुळे हा पडल्यामुळे आता तो पुन्हा उभारण्यासाठी लाकूड कोठून आणावे, हा प्रश्न निर्माण झाला आहे. यामुळे झालेल्या वाड्याची नुकसानभरपाई तातडीने मिळावी, अशी मागणी देविदास मालकर यांनी केली आहे.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक

## कागदपत्र हरवले आहेत

मी शुभम नामदेव बैकर माझा केंद्रीय विद्यालय अंबरनाथ शाळेचा, शाळा सोडल्याचा दाखला र,न,३१४९०८ दि,१०/८/२०२१, हे कागदपत्र माझ्याकडून गहाल झाले आहेत, या कागदपत्राचे गैरवापर होणार नाही त्यासाठी मी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करत आहे.

पत्ता ,
(२०४) निखिल गौरव अपार्टमेंट, वाणी आली
विठ्ठल मंदिर, बदलापूर कुळगाव पूर्व
ता.अंबरनाथ जिल्हा ठाणे पि,४२१५०३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, १ ) रमेशचंद्र गोपालदास संघवी २/१) विना (बिना) नगीनदास अंबावी २/२) वैशाली निलेश अंबावी २/३) पायल तेजस अंबावी ३) दिनेश जादवभाई मांगुकिया ४) चित्रेश अनिलकुमार उदानी सर्व राहणार :- वाशी, नवी मुंबई, यांच्या नावे सामायीक मालकी हक्कात, ताबे कब्जात, वहीवाटीखाली खालील वर्णन केलेली मिळकत आहेत. सदरहू मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - कलोते रयती, तालुका खालापुर, जिल्हा रायगड**

| क्र | भोगवटादार वर्ग | गट/सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पैसे. | भोगवटादाराचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ | १७ | ६/ब | ०.४०.०० | ०.२८ | रमेशचंद्र गोपालदास संघवी |
| २ | | | | १.४२.३० | ०.५६ | विना (बिना) नगीनदास अंबावी<br>वैशाली निलेश अंबावी<br>पायल तेजस अंबावी |
| ३ | | | | १.२१.०० | ०.४८ | दिनेश जादवभाई मांगुकिया |
| ४ | | | | ०.२०.०० | ०.१४ | चित्रेश अनिलकुमार उदानी |
| | | | | एकुण क्षेत्र ३.२३.३० | | |

सदरहू मिळकत ही उपरोक्त मालकांच्या सामायीक मालकी हक्कात असून ७/१२ च्या उताऱ्यावर त्यांच्याच नावाची नोंद आहे. सदर मिळकतीचे हक्कांबाबत व शिर्षकांसदर्भात अन्य कोणाच्याही कसल्याही प्रकारे अथवा तिचे कोणत्याही भागांवर विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, पोटगी, लिज, ताबा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा कोणत्याही कोर्टात अगर अधिकाऱ्यापुढे वादाचा विषय असल्यास अथवा इतर कोणत्याही प्रकारे मिळकतीचे मालकी हक्कांबाबत हरकत असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे मुदतीत खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यांच्या कागदपत्रांच्यासहीत लेखी स्वरूपात हरकत द्यावी.

वरील मुदतीत तशा प्रकारच्या हरकती न आल्यास ततसंबंधी कोणाचेही, कसलेही हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडून दिले आहेत. असे गृहीत धरून आमचे अशिल वरील मिळकतींच्या संदर्भातील व्यवहार पुर्ण करतील हा मुदती नंतर उपस्थित केलेल्या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे कळावे.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०३.१०.२०२४

**अ‍ॅड. सौ. निशिगंधा श्रीकांत माळी**
पत्ता रूम नंबर ३०२, बेबीका आपार्टमेंट, व्ही. के. हायस्कूल मागे,
लाईन आळी, पनवेल ४१०२०६ मो. नं. ९१३६११४६१५,
Email id:-adv.nsmali@gmail.com

## जाहीर सूचना

याद्वारे सर्व संबंधितांना सूचना देण्यात येते कि, आम्ही, आमच्या अशिलांच्या वतीने, **(१) पामकोर लँड एल.एल.पी.**, मर्यादित दायित्व भागीदारी अधिनियम, २००८ च्या तरतुदींनुसार प्रस्थापित असलेली एक मर्यादित दायित्व भागीदारी, जिचे नोंदणीकृत कार्यालय : ३०२, एलिट स्क्वेअर, २७४, पेरीन नरिमन स्ट्रीट, बाजारगेट, मुंबई– ४००००१ येथे आहे आणि जिचे कार्ल नवझेर इराणी आणि नवझेर जहांगीर इराणी हे भागिदार आहेत, यांच्या (अ) मौजे मापगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील गट क्र. १५२/२, क्षेत्रफळ ३४९६ चौ.मी. चा भाग असणाऱ्या जमिनीच्या तुकड्याच्या संबंधातील आणि (ब) गट क्र.१५४/२, क्षेत्रफळ ५४०० चौरस मीटर जागेच्या संबंधातील आणि **(२) कार्ल नवझेर इराणी**, ज्यांचा पत्ता: १४२, अशोका अपार्टमेंट्स, १४ वा मजला, ६८, नेपियन सी रोड, मलबार हिल, मुंबई – ४००००६ असा आहे. यांच्या यातील **पहिल्या परिशिष्टामध्ये** अधिक विशेषरित्या वर्णन केलेल्या मापगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील गट क्र. १५१, क्षेत्रफळ ३७३० चौ.मी. (एकत्रितपणे "**विक्री मालमत्ता**" असा उल्लेख करण्यात आलेला आहे) जमिनीच्या संबंधातील मालकी अधिकार, हक्क आणि हितसंबंधांची चौकशी करीत आहोत. विक्री मालमत्तेकडे जाण्याचा प्रवेश मार्ग यातील **दुसऱ्या परिशिष्टामध्ये** अधिक विशेषरित्या वर्णन केलेल्या सर्व गाव सत्रीजे, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील गट क्र. १६८/१, १५१/१/३, १४९, १४८/१, १४८/३, १४८/४ आणि १४८/५चा भाग असलेल्या आणि मापगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील गट क्र. १५०, १४७ आणि १५२/२ चा भाग असणाऱ्या जागेमधून (एकत्रितपणे "**मार्गाधिकार**" असा उल्लेख करण्यात आलेला आहे.) जातो. विक्री मालमत्ता आणि मार्गाधिकार यांचा एकत्रितपणे मालमत्ता असा उल्लेख करण्यात आलेला आहे.

सदर मालमत्तेमध्ये किंवा त्यातील कोणत्याही भागामध्ये कोणत्याही स्वरूपाचा कोणताही करारनामा, कंत्राट, भाडे, अनुज्ञप्ती, विक्री, गहाण, धारणाधिकार, आकार, निर्गम, बक्षिस, विकासाधिकार, भाडेपट्टा, पोट-भाडेपट्टा, भाडेपट्ट्या खालील, अभिहस्तांकन, वारसा, मृत्युपत्रीत देणगी, उत्तराधिकार, अदलाबदल, भाडेदारी, कब्जा, सुविधाधिकार, मार्गाधिकार, भागिदारी, न्यास, कुटुंब व्यवस्था/तडजोड, कोणत्याही न्यायालयाचा हुकुमनामा किंवा आदेश, अधिकार, प्रसंविदा किंवा अट, परिरक्षा, भार किंवा अन्य काही असेल तर त्याद्वारे कोणताही शेअर, अधिकार, हक्क, दावा, लाभ, मागणी किंवा हितसंबंध असणाऱ्या किंवा दावा सांगणाऱ्या सर्व व्यक्तींनी/संस्थांनी निम्नस्वाक्षरीकर्ता यांना यातील तारखेपासून **१४ (चौदा) दिवसांच्या** आत पाठींबा देणाऱ्या दस्तऐवजांसह लेखी स्वरूपामध्ये ज्ञात होण्यासाठी कळविणे आवश्यक आहे. याद्वारे आवश्यक असलेला कोणताही दावा जर लेखी स्वरूपात करण्यात आला नाही तर तो दुर्लक्षित करण्यात येईल आणि अशा दाव्याचा अधित्याग आणि/किंवा परित्याग करण्यात आलेला आहे, असे समजण्यात येईल आणि असा दावा बंधनकारक असणार नाही.

**पहिले परिशिष्ट**
**(विक्री मालमत्तेचे वर्णन)**

| अनु. क्र. | गट क्र. | मालक | खरेदी खालील क्षेत्र (चौरस मीटर मध्ये) | ७/१२ उताऱ्यानुसार एकूण क्षेत्र | खरेदी अंतर्गत क्षेत्राच्या सीमा |
|---|---|---|---|---|---|
| १. | १५१ | कार्ल नवझेर इराणी | ३७३० | ३७३० | पूर्व दिशेकडे : मौजे मापगावचा गट क्र. १५२/२ आणि गट क्र. १४७,<br>पश्चिम दिशेकडे : मौजे मापगावचा गट क्र. १५० आणि गट क्र. १४८,<br>दक्षिण दिशेकडे : मौजे मापगावचा गट क्र. १४८,<br>उत्तर दिशेकडे : मौजे मापगावचा गट क्र. १५० आणि गट क्र. १५२/२ |
| २. | १५२/२ | पामकोर लँड एलएलपी | ३४९६ | १४८७० | पूर्व दिशेकडे : गट क्र. १५४/२, मौजे मापगाव,<br>पश्चिम दिशेकडे : गट क्र. १५२/२, मौजे मापगावचा उर्वरित भाग,<br>दक्षिण दिशेकडे : गट क्र. १५१, १४७ आणि १४४, मौजे मापगाव,<br>उत्तर दिशेकडे : गट क्र. ४४, मौजे मापगाव |
| ३. | १५४/२ | पामकोर लँड एलएलपी | ५४०० | ५४०० | पूर्व दिशेकडे : मौजे मापगावचा गट क्र. १३७ आणि गट क्र. ३२२<br>पश्चिम दिशेकडे : मौजे मापगावचा गट क्र. १५२/२,<br>दक्षिण दिशेकडे : मौजे मापगावचा गट क्र. १४२<br>उत्तर दिशेकडे : मौजे मापगावचा गट क्र. १५४/१ |

सर्व मालमत्ता गाव मापगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील आहेत.

**दुसरे परिशिष्ट**
**(मार्गाधिकाराचे वर्णन)**

| अनु. क्र. | गट क्र. | गाव | मार्गाधिकाराखालील क्षेत्र (चौ.मीटर मध्ये) | मार्गाधिकाराचे वर्णन |
|---|---|---|---|---|
| १. | १६८/१ | सतिर्जे | गट क्र. १५१, १५२/२ आणि १५४/२ साठी:- ५९० चौरस मीटर | ४.५ मीटर रुंद (पूर्व-पश्चिम) × १३१ मीटर लांब (उत्तर-दक्षिण) सार्वजनिक रस्त्याच्या दक्षिण बाजूपासून सुरू होणारा आणि गट क्र. १५१/१/३ च्या उत्तरेला संपणारा. |
| २. | १५१/१/३ | सतिर्जे | गट क्र. १५१, १५२/२ आणि १५४/२ साठी:- ६६१.५० चौरस मीटर | ४.५ मीटर रुंद (उत्तर-दक्षिण) × १४७ मीटर लांब (पूर्व-पश्चिम) गट क्र. १६८/१ च्या दक्षिण बाजूपासून सुरू होणारा आणि गट क्र. १४९ च्या उत्तरेला संपणारा. |
| ३. | १४९ | सतिर्जे | गट क्र. १५१, १५२/२ आणि १५४/२ साठी:- ४८० चौरस मीटर | ६ मीटर रुंद (पूर्व-पश्चिम) × ८० मीटर लांब (उत्तर-दक्षिण) गट क्र. १५१/१/३ च्या दक्षिण बाजूपासून सुरू होणारा आणि गट क्र. १४८/१ च्या उत्तरेला संपणारा. |
| ४. | १४८/१ | सतिर्जे | गट क्र. १५१, १५२/२ आणि १५४/२ साठी:- ५४६ चौरस मीटर | ६ मीटर रुंद (पूर्व-पश्चिम) × ९१ मीटर लांब (उत्तर-दक्षिण) गट क्र. १४९च्या दक्षिण बाजूपासून सुरू होणारा आणि गट क्र. १४८/३ च्या उत्तरेला संपणारा. |
| ५. | १४८/३ | सतिर्जे | गट क्र. १५१,१५२/२ आणि १५४/२ साठी:- ३४८ चौरस मीटर | ६ मीटर रुंद (पूर्व-पश्चिम) × ५८ मीटर लांब (उत्तर-दक्षिण) गट क्र. १४८/१ च्या दक्षिण बाजूपासून सुरू होणारा आणि गट क्र. १४८/४ च्या उत्तरेला संपणारा. |
| ६. | १४८/४ | सतिर्जे | गट क्र. १५१, १५२/२ आणि १५४/२ साठी:- १०८ चौरस मीटर | ९ मीटर रुंद (पूर्व-पश्चिम) × १२ मीटर लांब (उत्तर-दक्षिण) गट क्र. १४८/३ च्या दक्षिण बाजूपासून सुरू होणारा आणि गट क्र. १४८/५ च्या उत्तरेला संपणारा. |
| ७. | १४८/५ | सतिर्जे | गट क्र. १५१, १५२/२ आणि १५४/२ साठी:- ३२४ चौरस मीटर | ६ मीटर रुंद (पूर्व-पश्चिम) × ५४ मीटर लांब (उत्तर-दक्षिण) गट क्र. १४८/४ च्या दक्षिण सिमेपासून सुरू होणारा आणि उत्तर सिमेवर गट क्र. १५० च्या संपणारा. |
| ८. | १५० | मापगाव | गट क्र. १५१,१५२/२ आणि १५४/२ साठी:- ३१० चौरस मीटर | १५ मीटर (पूर्व-पश्चिम) लांबीसाठी ९ मीटर रुंद (उत्तर-दक्षिण) आणि ५ मीटर (लांबीसाठी अंदाजे ६ ते ९ मीटर रुंद (उत्तर-दक्षिण), २३ मीटर (पूर्व-पश्चिम) लांबीसाठी ६ मीटर रुंद, गट क्र. १४८/५ च्या दक्षिण सिमेपासून सुरू होणारा आणि गट क्र. १५० च्या उत्तर सिमेवर संलग्न आणि समांतर असणारा आणि गट क्र. १५२/२ च्या उत्तर पश्चिम सीमेवर संपणारा. |
| ९. | १४७ | मापगाव | गट क्र. १५२/२ आणि १५४/२ साठी:- ४०० चौरस मीटर | गट क्र. १४७ चा उत्तरेचा भाग, क्षेत्रफळ ४०० चौरस मीटर आणि खालील प्रमाणे सिमित असलेला :<br>पूर्व दिशेकडे : मौजे मापगावचा गट क्र. १५२/२;<br>पश्चिम दिशेकडे : मौजे मापगावचा गट क्र. १५२/२;<br>दक्षिण दिशेकडे : मौजे मापगावचा गट क्र. १४७ चा उर्वरित भाग;<br>उत्तर दिशेकडे : मौजे मापगावचा गट क्र. १५२/२; |
| १०. | १५२/२ | मापगाव | गट क्र. १५१:- ४२० चौरस मीटर; गट क्र. १५२/२ आणि १५४/२ साठी :- ४२० चौरस मीटर आणि ५०४ चौरस मीटर, एकूण क्षेत्रफळ ९२४ चौरस मीटर; गट क्र. १५२/२ साठी :-४५० चौरस मीटर | गट क्र. १५१, १५२/२ आणि १५४/२ साठी :- मापगाव गावाच्या गट क्र. १५२/२ दक्षिण-पश्चिम सीमेपासून सुरू होणारा आणि गट क्र. १४७ च्या उत्तर-पश्चिम सीमेवर समाप्त होणारा ६ मीटर रुंद (उत्तर-दक्षिण) × ७० मीटर लांब (पूर्व-पश्चिम);<br>गट क्र. १५२/२ आणि १५४/२ साठी(५०४ चौ. मीटर) :- मापगाव गावाच्या गट क्र. १४७ च्या पूर्वेकडील सीमेपासून सुरू होणारा आणि गट क्र. १५४/२ च्या दक्षिण-पश्चिम कोपऱ्यावर समाप्त होणारा ६ मीटर रुंद (उत्तर-दक्षिण) × ८४ मीटर लांब (पूर्व-पश्चिम) आणि<br>गट क्र. १५२/२ साठी(४५० चौ. मीटर):- मापगाव गावाच्या गट क्र. १४७च्या उत्तर-पूर्व सीमेपासून सुरू होणारा आणि गट क्र. ५२/२ च्या मध्यवर्ती भागावर समाप्त होणारा ६ मीटर रुंद (पूर्व-पश्चिम) × ७५ मीटर लांब (उत्तर-दक्षिण) |

वरील सर्व तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथे आहेत.

**आज दिनांक ३ ऑक्टोबर,२०२४**

**मोनिका भोसले**
**भागिदार**
**ट्रायलिगल**
७वा मजला, टॉवर २ए, वन वर्ल्ड सेंटर, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल (पश्चिम), मुंबई – ४०००१३
मोबाईल: ९८२०३००९९४ ईमेल: monika.bhonsale@trilegal.com / maithili.vagal@trilegal.com / varun.shah@trilegal.com

## तळा नगरपंचायत तळा

**ता.तळा, जिल्हा रायगड**
**खुली ई-निविदा सुचना सन २०२४-२५**

जा.क्र.३३६/ई-निविदा/त.न.पं.२०२४-२५, दिनांक:०१/१०/२०२४

मा.मुख्याधिकारी, तळा नगरपंचायत, जि.रायगड यांचेकडून तळा नगरपंचायत हद्दीमध्ये विविध विकास कामे करणेकरीता निविदा मागविण्यात येत आहे. या कामासंबंधी सविस्तर तपशील व अटी-शर्ती www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दिनांक ०३/१०/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दिनांक ०९/१०/२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहे.

सही/-
**(मनिषा वजाळे)**
**मुख्याधिकारी**
**तळा नगरपंचायत, तळा**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे कामथ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती, त्या मिळकतींचे विद्यमान मालक झेहरा हसन तैबजी यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| १) कामथ | २९४ | ०-०७-५० | १.८३ |
| | | पो. ख. ०-०१-५० | |
| | | ०-०९-०० | |
| २) कामथ | ३०२ | ०-०७-८० | १.९४ |
| | | पो. ख. ०-०१-८० | |
| | | ०-०९-६० | |

तसेच त्यामध्ये असलेले ग्रुपग्रामपंचायत किहीम घर नं.२२१२.

सदरच्या मिळकती या त्यांचे निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा त्यांच्या कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतींचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व त्यांचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : ३/१०/२०२४

सही/-
अ‍ॅड. गणेश गोविंद पाटील.
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा.सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राम्हणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे माणगांव तर्फे वरेडी, व माणगांव ठाकुरवाडी ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्क नोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत तिचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे माणगांव तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| बि.के.मंजुनाथ | २८ | १० | ०-०८-०० | ०.०५ |
| | २८ | ७ | ०-१७-०० | ०.०८ |
| | २८ | ८ | ०-२७-०० | ०.११ |
| | २८ | ९ | ०-०९-०० | ०.०५ |
| | ६६ | २ब | ०-४४-४० | ३.७२ |

**मौजे माणगांव ठाकुरवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| बि.के.मंजुनाथ | १९ | १ | ०-३७-०० | ०.१९ |
| | १९ | ७ | १-०९-०० | ०.५८ |
| | १७ | ८ | ०-३१-०० | ०.१७ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारचे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध बोजारहित आहे, असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
दिनांक ०३/१०/२०२४

**अ‍ॅड. साहिल राजेंद्र निगुडकर**
पत्ता: कोर्ट व्ह्यु को.ऑप.हौ.सोसायटी,
शॉप नं.१, कर्जत सिव्हील कोर्ट समोर, कर्जत रायगड
मो.९५९५३२४२३४/८८८८०९८०८८

## पेण नगरपरिषद, पेण

**आरोग्य विभाग**
**ई-निविदा सूचना सन-२०२४-२०२५**

पेण नगरपरिषद, पेण जि.रायगड यांजकडून सन २०२४-२०२५ आर्थिक वर्षासाठी Construction & Installation of Machinery For Solid Waste Manegement Plant Under sbm-2 At Waste Processing Plant, pen या कामासाठी दिनांक ०३/१०/२०२४ ते दि.२३/१०/२०२४ पर्यंत अनुभवी व इच्छुक व्यक्ति/संस्था/कंपनी यांजकडून निविदा/दरपत्रक मागविणेत येत आहेत. सदर कामासाठी इसारा रक्कम रू. ९३,४१९/- मात्र निविदा व फॉर्म फि १०००/- मात्र इतकी राहिल. निविदा जमा करण्याचा दिनांक २५/१०/२०२४ पर्यंत राहिल.

सदर संपुर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदाद्वारे ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणालीवर होईल. सदर निविदा नोटीस, प्रसिद्धी सूचना, आवश्यक असणारी कागदपत्रे, निविदा फॉर्म फी इसारा रक्कम भरणे व शुद्धीपत्रक इत्यादी विषयी माहिती http:www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. वरील कामाची निविदा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून मिळेल.

सही/-
**प्रशासक तथा मुख्याधिकारी,**
**पेण नगरपरिषद, पेण**

नि ११८/ड
अ‍ॅड. एस.वाय.बारटक्के
वादी यांचे वकील

## जाहीर नोटीस

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो. यांचे न्यायालयात**

स्पेशल मुकदमा क्र. १३५/२०२३

सौ. मेघा अविनाश घरत ) वादी

विरूध्द

२२) मेसर्स ए.एन.ए. रिअल्टी तर्फे भागिदार )
अ) श्री. नारायण मांडन गोठी )
ब) श्री. सैय्यद अजीम जाफर रिझवी )
क) श्री. किर्ती बचुभाई पटेल ) प्रतिवादी
ड) श्री. दिपेश महेंद्र जैन )
इ) श्री. महेंद्र गेनमल जैन )
प) श्री.प्रेमजी बचुभाई पटेल )
फ) श्री. पियुष भरत जैन )

सर्व मु.फ्लॅट नं. सी./६०४, श्रीजी हाईट्स
को.ऑप. हौसिंग लिमिटेड, प्लॉट नं. ए.बी.सी.,
एच.पी. पेट्रोलपंपाजवळ, सेक्टर क्र. ४६ अ,
सिवुड्स, नेरूळ, नवी मुंबई- ४००६१४

या जाहीर संमन्स/नोटीस द्वारे आपणांस कळविण्यात येते की, मौजे गावठाण व मौजे जासई, ता. उरण, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती.

| अ.क्र. | मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| ०१) | जासई | १४७(संपादित) | ३ | ०.२२.० | ३.७५ |
| ०२) | जासई | ७१ (संपादित) | २ | ०.२२.० | ०.०० |
| ०३) | जासई | ४८ (संपादित) | ५ | ०.२९.० | २.०६ |
| ०४) | जासई | १२८ (संपादित) | ४ | ०.०३.० | ०.०३ |
| ०५) | जासई | १२८ (संपादित) | ७ | ०.००.८० | ०.०० |
| ०६) | जासई | १३८ (संपादित) | १ | ०.०६.६० | ०.०० |
| ०७) | जासई | १४८ (संपादित) | ३ | ०.०२.५० | ०.५० |
| ०८) | गावठाण | १४ (संपादित) | १ | ४.४०.० | ९.४४ |
| ०९) | जासई | ७५ (विक्री) | ८ | ०.४९.३० | ६.७१ |
| (१०) | जासई | १३० (विक्री) | - | ०.४०.५ | ५.१२ |
| (११) | जासई | १२८ (विक्री) | ९ | ०.०५.६० | ०.५६ |
| १२) | जासई | १२८ (विक्री) | १० | ०.०९.० | ०.१९ |
| १३) | जासई | १२८ (विक्री) | ११ | ०.२२.० | ४.४४ |
| १४) | जासई | १२९ (विक्री) | - | ०.०५.१० | ०.४४ |
| १५) | जासई | १३१ (विक्री) | १/अ | १.०७.०० | २.१३ |
| १६) | गावठाण | ११ | - | ४.३४.० | ७.८७ |
| १७) | गावठाण | १२ | १/अ | ३.४८.० | ४.५६ |
| १८) | गावठाण | १३ | १/अ | १.०९.१० | १५.२५ |
| १९) | गावठाण | १३ | १/ब | ०.४०.० | ३.६२ |
| २०) | गावठाण | ७ | १२ | ०.२०.० | ०.३४ |
| (२१) | गावठाण | १० | - | ०.१०.० | ०.५३ |
| २२) | जासई | ४४ | ४ | ०.०९.१० | १.३१ |
| २३) | जासई | ४६ | ७ | ०.१४.५० | २.०० |
| २४) | जासई | ४७ | १ | ०.१६.०० | २.४५ |

येणे प्रमाणे वर्णनाचे मिळकतीपैकी अनुक्रमांक १ ते ८ कडील मिळकती संपादित झाल्या असून अनुक्रमांक ८ कडील संपादनाबाबत नोड द्रोणागिरी सेक्टर क्र. ५६, भुखंड क्र. ३३, क्षेत्र २९०० चौरस मिटर हा भुखंड मंजूर झाला आहे.

वर नमुद मिळकती संदर्भात वादी यांनी या न्यायालयात हक्क प्रस्थापना करीता, निरंतरचे ताकिदी करीता, दिनांक २८.१०.२०१६ रोजीचे "ॲग्रीमेंट टू लिज, दिनांक १०.०४.२०१७ रोजीचे त्रिपक्षीय करार, दिनांक २१.०५.२०१८ रोजीचे खरेदीखत व दिनांक १७.१२.२०१९ रोजीचे खरेदीखत रद्द करून मिळणेकरीता दावा दाखल केला आहे. दाव्यामध्ये तुमचा पत्ता वर प्रमाणेच आहे. मात्र, तुम्ही संमन्स/नोटीस घेण्यास टाळाटाळ करीत आहात, या कारणा करीता नोटीशीची बजावणी झालेली नाही. सबब, या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, वर नमुद दाव्याचे कामी तुम्ही, स्वतः अगर आपले नेमलेले प्रतिनिधी वा वकिल यांचे मार्फत या मा. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, अलिबाग यांचे न्यायालयात दिनांक २५.१०.२०२४ रोजी हजर रहावे. आपण हजर न राहील्यास एकतर्फी काम चालेल, याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०१/१०/२०२४ रोजी माझ्या सहिनीशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

सही/-
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर**
**पनवेल - रायगड**

सही/-
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर**
**पनवेल-रायगड**

जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र.२४७/ म.प्र -१, दि.१८/१०/२०२३

**परिशिष्ट-३**
**(ई-निविदेसाठी जाहिरात नमुना)**

## महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि.रायगड**
**ई-मेल :-eerid२४@gmail.com दुरध्वनी क्र. ०२१४०/२५०८५७**
**निविदा सूचना क्र.३५ सन २०२४-२५ (दुसरी मागणी)**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीन कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि.रायगड पिन नं. ४०२३०४ हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेस्थळ : https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर ई-निविदा सूचना व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि.रायगड पिन नं.४०२३०४ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास : https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ क्र. | कामाचे नाव | निविदेची किंमत रु (G.S.T. & royalty धरुन) | इसारा रक्कम रु. | काम पुर्ण करणेचा कालावधी | ई-निविदा संचाची किंमत रु. | कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | राजनाला उजवा कालवा कि.मी.१ ते ८ मध्ये मौजे मांडवणे, हेदवली, सावळा येथे कालव्यावरील सेवापथाची दुरूस्ती करणे, माती भराव करणे. | १,३८,६२,०१६/- | १,३८,७००/- | १२ महिने | रु.२०००/- + रु.३६०/- रु.२३६०/- जी.एस.टी.सहित (ना-परतावा) | वर्ग-४ व त्यावरील |

**निविदा उपलब्ध कालावधी दि.०१/१०/२०२४ ते दि.०८/१०/२०२४**
**ई-निविदा उघडण्याचा दि.१०/१०/२०२४**
**खालील संकेतांक स्थळावर ई-निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.**

१. संकेतस्थळ : https://www.mahatenders.gov.in
२. कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि.रायगड या कार्यालयातील सूचना फलक.
३. जलसंपदा विभागाचा दि. १८/१०/२०२३ रोजीच्या सुधारीत शासन निर्णयान्वये कार्यवाही करणेत यावी.
४. पत्रव्यवहारासाठी संपर्क व्यक्ती व पत्ता:- कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि.रायगड पिन नं.४०२३०४
ई-मेल : eerid२४@gmail.com.
५. निविदा सादर करण्यासाठी निविदाकार यांनी केलेल्या आर्थिक खर्चास जबाबदार न राहता कोणतीही एक किंवा सर्व निविदा फेटाळण्याची किंवा संपुर्ण निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकाऱ्याने राखुन ठेवलेले आहेत.
६. निविदा प्रक्रियेमध्ये पश्चात अर्हता निकष ठेवण्यात आलेले आहेत.
७. ई-निविदा प्रक्रियेसाठी कोणत्याही परिस्थितीत निविदाकाराकडून निविदा छापील प्रतिच्या (Hard Copy) स्वरुपात स्वीकारली जाणार नाही.
टिप:- निविदा भरतांना आपले दर G.S.T. वगळून भरणे बंधनकारक आहे. G.S.T. चे दर संबंधीत विभागाचे नियमाप्रमाणे लागू राहतील.

सही/-
**(इंजि.मिलींद पवार )**
**कार्यकारी अभियंता,**
**रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड.**

# पीएनबी मेटलाइफ ज्युनियर बॅडमिंटन चॅम्पियनशिप

## तरुण खेळाडूंच्या कर्तृत्वाचा सन्मान

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

पीएनबी मेटलाइफ ज्युनियर बॅडमिंटन चॅम्पियनशिप (जेबीसी) च्या ८व्या पर्वाचा समारोप हैदराबाद येथीलस्टेडियममध्येअंतिमसामन्याने झाला. या स्पर्धेच्या निमित्ताने देशातील तरुण बॅडमिंटन खेळाडूंच्या कर्तृत्वाचा सन्मान करण्यात आला. यावेळी जेबीसीने सलग तिसऱ्या वर्षी ऐतिहासिक कामगिरी केली आहे. अनेक शहरांमधील बॅडमिंटन चॅम्पियनशिपमध्ये सर्वाधिक मुलांचा सहभाग' या प्रकारात हा जागतिक विक्रम नोंदवण्यात आला आहे.

यावेळी आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेते आणि जेबीसीचे मार्गदर्शक चिराग शेट्टी आणि सात्विक रंकीरेड्डी, इन्शुरन्स इन्फॉर्मेशन ब्युरो ऑफ इंडियाचे सीईओ व्यंकट चंगवल्ली, पीएनबी मेटलाइफचे सीईओ आणि एमडी समीर बन्सल, पीएनबी मेटलाइफचे सीएमसीओ सौरभ लोहटिया यांनी सांगता समारंभाचे नेतृत्व केले. त्यांनी विजेत्या युवा खेळाडूंना प्रतिष्ठित जेबीसी ट्रॉफी प्रदान केली आणि त्यांच्या कामगिरीचा सन्मान केला. कार्यक्रमात चिराग आणि सात्विक यांनी विशेष मार्गदर्शन सत्र घेतले. या सत्रात त्यांनी तरुण बॅडमिंटन खेळाडूंना आणि त्यांच्या पालकांना खेळ सुधारण्यासाठी महत्त्वपूर्ण सल्ला दिला.

यावेळी सात्विकसाईराज रंकीरेड्डी म्हणाले की, या वर्षाच्या ज्युनियर बॅडमिंटन चॅम्पियनशिपमध्ये तरुण खेळाडूंची अपूर्व प्रतिभा आणि उत्साह पाहणे खरोखरच प्रेरणादायी आहे. त्यांची समर्पण भावना आणि खिलाडूवृत्ती तळागाळाच्या पातळीवर खेळाला चालना देण्याच्या विकासाचे महत्त्व अधोरेखित करून देत आहे. तसेच, जेबीसी २०२४ चे सहमार्गदर्शक चिराग शेट्टी म्हणाले की, पीएनबी मेटलाइफ ज्युनियर बॅडमिंटन चॅम्पियनशिपच्या ८व्या पर्वामध्ये तरुण खेळाडूंनी दाखवलेली ऊर्जा आणि कौशल्य खरोखरच आश्चर्यकारक आहे. ही स्पर्धा उदयोन्मुख बॅडमिंटन स्टार खेळाडूंसाठी एक प्रेरणादायी व्यासपीठ झाली आहे. सलग तिसऱ्या वर्षी स्वतःचा जागतिक विक्रम मोडणे हे या स्पर्धेच्या वाढत्या प्रभावाचे द्योतक असल्याचे देखील चिराग यांनी सांगितले.

पीएनबी मेटलाइफचे समीर बन्सल यांनी या स्पर्धेच्या यशाबद्दल अभिमान व्यक्त केला आहे. ते म्हणाले की, पीएनबी मेटलाइफ



ज्युनियर बॅडमिंटन चॅम्पियनशिपचा आणखी एक यशस्वी पर्व संपल्यावर आम्ही सलग तिसऱ्या वर्षी मिळवलेल्या जागतिक विक्रमाचा आनंद साजरा करत आहोत. तसेच, देशभरातील उदयोन्मुख खेळाडूंचाही सन्मान करत आहोत. या चॅम्पियनशिपमधून युवा खेळाडूंना त्यांची कौशल्ये सिद्ध करण्यासाठी आणि प्रगती करण्यासाठी संधी उपलब्ध करून देणे किती महत्त्वाचे आहे, हे या विक्रमातून दिसून आले आहे. जेबीसी ही स्पर्धा उदयोन्मुख गुणवंतांना विकसित करण्यासाठी आणि भविष्यातील आव्हानांसाठी त्यांना तयार करण्यासाठी महत्त्वपूर्ण व्यासपीठ म्हणून यापुढेही कार्यरत राहणार असल्याचे समीर बन्सल यांनी सांगितले आहे.

## दांडगुरी हायस्कूलचे घवघवीत यश

**। बोर्लीपंचतन । वार्ताहर ।**



रा.पां. दिवेकर दांडगुरी हायस्कूल विद्यालयाने वैयक्तिक व सांघिक स्पर्धेत १००, २००, ४००, ६००, ८००, १ हजार ५०० व ३ हजार मीटर धावण्यात तसेच ४ x १०० व ४ x ४०० मीटर रिलेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. तसेच, मुलींच्या हॉलीबॉल स्पर्धेत १४ वर्षे वयोगटात प्रथम क्रमांक तर, १७ वर्षे वयोगटात द्वितीय क्रमांक पटकावला आहे. खो-खो स्पर्धेत १४ व १७ वर्षे वयोगटातील मुले व मुलींनी प्रथम क्रमांक पटकावला आहे. या सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक गणेश पाटील, विश्वास खोत, संदीप तमनर, बाबुराव जगनर आदी शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले.

या स्पर्धेचा बक्षीस वितरण कार्यक्रम संस्थापक रा.पां. दिवेकर दांडगुरी हायस्कूलमध्ये संपन्न झाला. यावेळी स्थानिक शाळा समितीचे सभापती वसंत राऊत, माजी गटशिक्षणाधिकारी राजन सांबरे, पंचक्रोशी क्रीडा मंडळाचे सचिव वाणी, मुख्याध्यापिका सांबरे, क्रीडा समन्वयक विजय मर्चंडे, विद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, तालुक्यातील सर्व क्रीडा शिक्षक तसेच सर्व खेळाडू उपस्थित होते.

## एमसीए पंच परीक्षेचा निकाल जाहीर

**। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र क्रिकेट असो.च्यावतीने आयोजित केलेल्या पंच परीक्षेचा अंतिम निकाल एमसीएकडून जाहीर करण्यात आला आहे. महारष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या अधिकार क्षेत्रातील २१ जिल्ह्यातील पंचांनी परीक्षेसाठी सहभाग घेतला होता. यामध्ये रायगड जिल्ह्याती पाच पंच उतिर्ण झाले आहेत. यात वरुण म्हात्रे (उरण), विघ्नहर्ता मुंढे (पनवेल), सागर मुळे (पेण), रोहन पाटील (उरण), चंद्रकांत चौधरी (कर्जत) यांचा समावेश आहे. उरणच्या वरुण म्हात्रे यांनी प्रॅक्टिकल परिक्षेत

### रायगडचे पाच पंच उत्तीर्ण

महाराष्ट्रात ९४% गुण प्राप्त करुन दुसरा क्रमांक पटकावला आहे. तर, बाकी सर्व पंचांनी ८०% पेक्षा अधिक गुण प्राप्त केले आहेत.

महाराष्ट्रातील सर्व पांचाना एमसीए यांच्या वतीने ऑनलाईन व कार्यशाळेच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात आले होते. तसेच, रायगड जिल्ह्यातील पंचांना जिल्हा क्रिकेट असो.च्यावतीने विशेष मार्गदर्शन मिळावे यासाठी माजी रणजी खेळाडू व विद्यमान बीसीसीआय पंच हर्षद रावले, मुंबई क्रिकेट असो. पंच राजन कसबे व रायगड जिल्ह्यातील क्रिकेट तज्ञ प्रशिक्षक नयन कट्टा यांनी गेले तीन महिने अथक परिश्रम घेऊन ऑनलाइन व कार्यशाळाच्या माध्यमातून मार्गदर्शन केले आहे. या पंच शिबिरासाठी आरडीसीएचे उपाध्यक्ष यशवंत साबळे व डी.के भोईर यांनी हॉल उपलब्ध करून दिला होता. तसेच, सर्व पंचाना मार्गदर्शन मिळावे यासाठी आरडीसीए सदस्य व स्टेट पॅनल पंच अँड. पंकज पंडित, राजेश पाटील, प्रदीप खलाटे, शंकर दळवी, सुयोग चौधरी यांनी परिश्रम घेतले आहेत. सर्व उतीर्ण झालेल्या पंचांचे आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुध्द पाटील, सचिव प्रदिप नाईक यांच्यासह सर्व पदाधिकारी, सदस्य, खेळाडू व क्रिकेट प्रेमींनी अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## आर अश्विनची कसोटीत घसरण

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताने बांगलादेशविरुद्ध कसोटी मालिकेत २-० फरकाने विजय मिळवला असून जसप्रीत बुमराह, विराट कोहली, आर अश्विन, यशस्वी जैस्वाल अशा अनेक खेळाडूंची कामगिरी चांगली झाली आहे. यामुळे कसोटी क्रमवारीत त्याचा फायदाही झाला आहे. आयसीसीने बुधवारी (दि.२) जाहीर केलेल्या ताज्या क्रमवारीत गोलंदाजांच्या यादीत बुमराहने अश्विनला मागे टाकले आहे. आता बुमराह गोलंदाजांच्या क्रमवारीत अव्वल क्रमांकावर आला आहे.

## तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा उत्साहात

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

क्रीडा व युवक सेवासंचलनालाय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय रायगड-अलिबाग आयोजित तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धांचे आयोजन वडवळ येथील माध्यमिक विद्यालयात शासनाच्यावतीने करण्यात आले होते. या कबड्डी स्पर्धेत खालापूर तालुक्यातील विविध वयोगटातील एकूण ४५ पुरूष व महिला संघांनी सहभागी होऊन आपल्या सांघिक खेळ कौशल्याचे प्रदर्शन केले. ही स्पर्धा १४, १७ व १९ वर्ष मुले व मुली या गटात खेळविल्या गेल्या. या स्पर्धेत विजेत्या व उपविजेता संघाना चषक देऊन गौरविण्यात आले. तर, विजेत्या संघाची रायगड जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

स्पर्धेच्या उद्‌घाटन समारंभ वेळी रायगड जिल्हा कबड्डी संघटनेच्या उपाध्यक्षा शिवानी जंगम, तालुका क्रीडा समन्वय जगदीश मरागजे, आयोजक जितेंद्र सकपाळ, सरपंच ज्ञानेश्वर सुतार, राजेंद्र पाशीलकर, तानाजी चव्हाण, एम.डी. चाळके, मुख्याध्यापिका वैशाली गोळे, मुख्याध्यापक सुधाकर थळे, अनिल मरागजे आणि वडवळ ग्रामस्थांसह अनेक कबड्डीप्रेमी उपस्थित होते.

### स्पर्धेचा अंतिम निकाल

**१४ वर्ष मुली:-**
विजेता संघ- जनता विद्यालय, खोपोली.
उपविजेता संघ- जनता विद्यालय इंग्रजी माध्यम, मोहोपाडा.

**१४ वर्ष मुले:-**
विजेता संघ- चिलठण विद्यालय, चिलठण.
उपविजेता संघ- सह्याद्री विद्यालय, खोपोली.

**१७ वर्ष मुली:-**
विजेता संघ- जनता विद्यालय, खोपोली.
उपविजेता संघ- माध्यमिक विद्यालय, वडवळ.

**१७ वर्ष मुले:-**
विजेता संघ- जनता विद्यालय, खोपोली
उपविजेता- चिलठण विद्यालय, चिलठण.

**१९ वर्ष मुली:-**
विजेता संघ- जनता विद्यालय कनिष्ठ महाविद्यालय, खोपोली.
उपविजेता- छत्रपती विद्यालय, वावोशी.

**१९ वर्ष मुले:-**
विजेता संघ- छत्रपती विद्यालय, वावोशी.
उपविजेता संघ- जनता विद्यालय कनिष्ठ महाविद्यालय, खोपोली.




● पनवेल महानगरपालिकेनी 'स्वच्छता एक धाव' मॅरोथॉनचे आयोजन केले होते. या मेरोथॉनला वडाले सरोवरपासून सुरुवात करण्यात आली होती. मेरोथॉनमध्ये सर्व पनवेलकर धावले असून यात ज्येष्ठ नागरिकांपासून ते लहान मुलांपर्यत सर्वांनी उत्स्फुर्त सहभाग घेतला होता.

## सर्फराज खानची द्विशतकी खेळी

**। लखनौ । वृत्तसंस्था ।**



इराणी कप २०२४ स्पर्धेच्या सामन्यात २०२३-२४ रणजी ट्रॉफी विजेता मुंबई संघ विरुद्ध शेष भारत संघ आमने-सामने आहेत. मंगळवारपासून हा सामना लखनौच्या एकाना क्रिकेट स्टेडियमवर सुरू असून या सामन्यात मुंबईने पहिल्या दोन्ही दिवसांवर वर्चस्व ठेवल्याचे दिसून येत आहे. या सामन्यात सर्फराज खानने द्विशतकी खेळीही केली आहे. त्याने सामन्याच्या दुसऱ्या दिवशी म्हणजेच बुधवारी त्याचे द्विशतक पूर्ण केले आहे. त्याने मुंबईसाठी सहाव्या क्रमांकावर फलंदाजीला उतरून २५३ चेंडूत त्याचे द्विशतक पूर्ण केल्यामुळे तो इराणी चषक स्पर्धेत द्विशतक करणारा मुंबईचा पहिलाच खेळाडू ठरला आहे. यामुळे त्याच्यासाठी आणि मुंबईसाठी हे ऐतिहासिक द्विशतक ठरले.

## रेवदंड्यातील दक्षचे 'सुवर्ण'यश

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

डू वर्ल्ड स्पोर्टस् युथ असोसिएशन इंडिया व कॉम्बॅट मार्शल आर्टस् असोसिएशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने 'सरी इंटरनॅशनल कराटे चॅम्पियनशिप २०२४' या आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेचे २९ सप्टेंबर रोजी अंधेरी स्पोर्ट्स कॉम्प्लेस येथे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत भारत, नेपाल, श्रीलंका, बांगलादेश, मलेशिया, इंडोनेशिया, ब्राझील, सिंगापूर, व इराण या देशातील एकूण ७३२ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. यावेळी रेवदंड्यातील दक्ष दिपेश पाटील याने आंतरराष्ट्रीय



कराटे स्पर्धेत दोन सुवर्णपदके प्राप्त केल्याबद्दल त्याच सर्वत्र कौतुक होत आहे.

यावेळी दक्ष पाटील याने कटा व कुमिते या दोन्ही विभागात सुवर्णपदक मिळविले आहे. तसेच, रजाक मुजावर याने कटा व कुमिते- सुवर्णपदक, सार्थक मोरे याने कटा व कुमिते- सुवर्णपदक, मुमूक्ष घरत याने कटा व कुमिते- सुवर्णपदक, समिक्षा पाटील हिने कटा- सुवर्णपदक व कुमिते- रौप्यपदक, श्रीयांस तावडे याने कटा- रौप्यपदक व कुमिते- कांस्यपदक, रूही ठाकूर हिने कटा व कुमिते- कांस्य पदक, तुंबा गोंडेकर याने कटा- कांस्यपदक, आयुष अंबाडे याने कटा- सुवर्णपदक व कुमिते प्रकारात कांस्यपदक मिळविले आहे. या स्पर्धेत अलिबागमधील जपान शी टोऱ्यू कराटे-डो इंडिया या संस्थेला उत्कृष्ठ चषक प्रदान करून गौरविण्यात आले.

## विश्वचषकासाठी महिला संघ सज्ज

**। दुबई । वृत्तसंस्था ।**

भारतीय महिला संघाने टी-२० विश्वचषकातील दोन्ही सराव सामने जिंकले आहेत. वेस्ट इंडिजविरुद्धचा पहिला सराव सामना भारताने २० धावांनी जिंकला, तर आता दक्षिण आफ्रिका महिला संघावर भारताने २८ धावांनी विजय मिळवला आहे. यामुळे महिला टी-२० विश्वचषक २०२४ साठी भारतीय महिला संघ सज्ज असल्याचे संकेत त्यांनी दिले आहेत.

दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेत भारताला प्रथम फलंदाजी दिली. यावेळी शफाली वर्मा शून्यावर माघारी गेली. कर्णधार हरमनप्रीतही १० धावांवर बाद झाली. जेमिमा रॉड्रिग्जने स्मृती मानधनाबरोबर ३० धावांचे योगदान देऊन माघारी परतली. यानंतर ऋचा घोषने दीप्ती शर्माच्या साथीने ५० चेंडूत ७० धावांची भागीदारी केली. ऋचाने २५ चेंडूत ३६ धावा केल्या. दीप्ती ३५ धावांवर नाबाद राहिली.



आफ्रिकेच्या अयाबोंगा खाकाने तीन बळी घेतले. यामुळे भारताचा डाव १५० च्या पुढे जाऊ शकला नाही.

प्रत्युत्तरासाठी आलेल्या सलामीवीर लॉरा वोल्वार्ड आणि तझमिन ब्रिट्स पॉवरप्लेपर्यंत ३७ धावांची भागीदारी केली. परंतु, पॉवरप्लेनंतर तझमिन बाद झाली. पुढे क्लोई ट्रायॉन (२४) व ॲनेरी डेर्कसेन (२१) हिने संघाला सावरण्याचा प्रयत्न केला, पण त्यांना यश आले नाही. आफ्रिकेला शेवटच्या षटकापर्यंत ११६ धावा करता आल्या.

### १२ सुवर्ण, ९ रौप्य आणि ७ कांस्यपदकांची कमाई

## पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत रायगडचा बोलबाला

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई-वडाळा येथे दि. २८ ते २९ सप्टेंबर या कालावधीत राज्यस्तरीय बॅक प्रेस क्लासिक स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत सब ज्युनिअर मुलींच्या स्पर्धेत बॉडी लाईन जिम खोपोलीची नंदिनी उपर ही सब जुनियर क्लासिक स्ट्राँग वुमन या किताबाची शानकरी ठरली. ज्युनिअर क्लासिक स्ट्राँग मॅन हा किताब संसारे जिमचा तन्मय पाटील याला मिळाला. तर, सिनियर इक्विप गट स्पर्धेत १०५ किलो वजनी गटात पनवेलचा गणेश तोटे विजेता झाला. तसेच, या पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत रायगडला पुरुष आणि महिला ज्युनिअर अशी दोन सांघिक विजेतेपद प्राप्त झाली आहेत. तर, क्लासिक स्पर्धेत सीनिअर आणि मास्टर पुरुषांचे उपविजेतेपद मिळाले आहे. याबद्दल पॉवरलिफ्टिंग अध्यक्ष गिरीश वेधक यांनी पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन तर्फे आनंद व्यक्त केला आहे.

या स्पर्धेत रायगड पॉवरलिफ्टिंगचे संघ प्रशिक्षक



म्हणून अरुण पाटकर यांची आणि संघ व्यवस्थापक म्हणून सुभाष टेंबे यांची निवड झाली होती. सहाय्यक म्हणून संदीप कृष्णा पाटकर यांना जबाबदारी दिली होती.

यास्पर्धेत रायगडच्या खेळाडूंनी चांगली कामगिरी करून १२ सुवर्ण, ९ रौप्य आणि ७ कांस्य अशी एकूण २८ पदके प्राप्त केली आहेत. या स्पर्धेतून निवडक खेळाडू हे राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघात सहभागी होणार आहेत.

### इक्विप व क्लासिक स्पर्धा महिला

सुवर्णपदक :- नंदिनी ऊपर (४७ किलो गट), अरे शिंदे (५२ किलो गट), गायत्री बडेकर (४३ किलो गट).
रौप्यपदक :- दिव्या महाडिक (४३ किलो गट).
कांस्यपदक :- लावण्या भगत (६९ किलो गट), गार्गी मसूरकर (५२ किलो गट), मयूरी अनगत (६३ किलो गट).

### इक्विप व क्लासिक स्पर्धा पुरुष

सुवर्णपदक :- जाहिद कणेकर, हर्षल देशमुख, गणेश तोटे, साहिल पोरवाल, तन्मय पाटील, ओमकार जाधव, बबन झोरे, नितीन शेजवळ, दिनेश पवार.
रौप्य पदक :- हनुमंत खरात, रितिक पोळ, दर्श पाटील, संस्कार सरदार, गणेश तोटे, रितिक पोळ, सचिन देशमुख, रमेश खरे.
कांस्यपदक :- हर्षद देशमुख, विनय पाटील, आसिफ सय्यद, नागनाथ घरत.

खेळाडूंनी मिळवलेल्या या यशाबाबत त्यांचे प्रशिक्षक मार्गदर्शक यांचा सुद्धा महत्त्वाचा वाटा आहे, असे मत संघटनेचे सहसचिव सचिन भालेराव, कार्याध्यक्ष यशवंत मोकल, खजिनदार राहुल गजरमल यांनी व्यक्त केले आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)